रायगड, गुरुवार दि. १० ऑगस्ट २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

राहुल गांधींचा मोदींवर हल्लाबोल

भारतमातेची हत्या

। नवी दिल्ली । वृतसंस्था ।

भारतमाता ही माझी आई आहे. मणिपूर हे भारताचं अविभाज्य अंग आहे. या सरकारने मणिपूरचे दोन तुकडे केलेत. म्हणजे या सरकारने माझ्या आईचेच तुकडे केले आहेत, असं म्हणत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मोदी सरकारवर हल्लाबोल केला. लोकसभेत सरकारवरील अविश्वास ठरावावरील सुमारे अर्ध्या तासाच्या भाषणात त्यांनी भारत जोडो यात्रा, अदानी प्रकरण आणि धगधगत्या मणिपूरला स्पर्श केला. नरेंद्र मोदींची तुलना त्यांनी रावणाशी केली. रावण ज्याप्रमाणे कुंभकर्ण आणि मेघनाद यांचंच ऐकत होता तसंच नरेंद्र मोदी करत आहेत असं राहुल गांधींनी म्हटलं आहे.

भारताचं लष्कर हे मणिपूरमध्ये एका दिवसात शांतता प्रस्थापित करु शकते. मात्र तुम्ही लष्कराला तिथे पाचारण करत नाही. कारण तुम्हाला मणिपूरमध्ये देश संपवायचा आहे.

- राहुल गांधी, काँग्रेस नेते

मोदी आज उत्तर देणार

अमित शाह संतापले

गृहमंत्री अमित शहा यांनी सरकारची बाजू मांडताना सरकारविरोधात आणलेला अविश्वास प्रस्ताव हा जनतेच्या प्रश्नांसाठी नव्हे तर संभ्रम निर्माण करण्यासाठी आणला असल्याचं म्हटलं आहे. मी विरोधकांना एवढचं सांगू इच्छितो की जेव्हा तुम्ही अविश्वास प्रस्ताव घेऊन येता तेव्हा त्यावर जी चर्चा होते त्यावेळी त्यामध्ये सरकारविरोधात काही मुद्दे तर मांडायचे. मी सर्व भाषणं ध्यान देऊन ऐकली आहेत त्यानंतर मी या निष्कर्षापर्यंत पोहोचलो आहे की हा अविश्वास प्रस्ताव केवळ भ्रम निर्माण करण्यासाठी आणला आहे, हा जनतेच्या इच्छांचं प्रतिबिंब नाही. अल्पमताचा तर प्रश्नच येत नाही. असेही शाह यांनी सांगितले. दरम्यान, विरोधकांनी मांडलेल्या अविश्वास ठरावावर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे गुरुवारी सभागृहात उत्तर देणार आहेत.

अलिबागमध्ये आदिवासींचा मोर्चा

» प्रशासनाला निवेदन सादर

» घोषणांनी दुमदुमले शहर

। अलिबाग । प्रतिनिधी ।

गाव तिथे रस्ता झालाच पाहिजे, रेशन दुकानात धान्य पाहिजे पैसे नको, आदिवासी एकजुटीचा विजय असो अशा घोषणा देत अलिबागमध्ये आदिवासी समाजाने सरकारविरोधात मोर्चा काढला. या मोर्चाला महिलांसह, पुरुष तरुण, तरुणी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यामुळे अलिबाग आदिवासी समाजाने फुलून गेले होते. निमित्त होते, जागतिक आदिवासी व क्रांती दिनाचे.

यावेळी मुकेश नाईक, कृष्णा पिंगळा धर्मा पिंगळा, भगवान नाईक, धर्मा लोभी आदींसह शेकडो आदिवासी समाज उपस्थित होते. जागतिक आदिवासी दिनाबरोबरच क्रांतिदिनाचे औचित्य साधून ही रॅली काढण्यात आली. सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले. त्यानंतर तेथून रॅलीला सुरुवात केली. शिस्तबध्द पध्दतीने घोषणा देत आदिवासी समाज त्यांच्या न्याय हक्काची जाणीव शासनाला करून देत होते. खालापूर येथील चौकमधील ईशाळवाडीमधील बांधवांचे स्थलांतरत करून त्यांना चांगली घरे बांधून द्यावी. मणिपूर येथे झालेल्या महिला अत्याचार प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. समान नागरी कायद्यामुळे आदीवासी समाजाला मिळणाऱ्या सुविधा बंद होणार आहेत. त्यात आदीवासी समाज भरडला जाण्याची भिती आहे. त्यामुळे समान नागरी कायदा रद्द करा. वन हक्क कायद्यांतर्गत येणारा दावे तात्काळ मंजूर करा.जात पडताळणी कार्यालय रायगड जिल्ह्यात सुरु करावा. आदिवासीवाड्यांकडे जाणारा रस्ता तयार करा. आदिवासी वाड्यांना गावठाण जागेचा दर्जा मिळावा. त्याठिकाणी रस्ते, पाणी, विद्यूत सुविधा मिळाव्यात. ८१ आदिवासी वाड्यातील •> पान २ वर

(छायाचित्र : समीर मापोरे)

आजचा अग्रलेख

मणिपूरच्या नावाने...

वेधक

दहशतवादी समजून तरुणाला मारहाण

रायगड : उत्तर प्रदेशातून कामानिमीत्त आलेल्या तौफीक अहमद याला आंतकवादी असल्याच्या संशयावरुन काही तरुणांनी मारहाण केली. त्यानंतर पोलिसांनी याची शहनिशा केली असता. तो कामानिमित्त तेथे वर्षभरापासून असल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी तौफिकला मारहाण करणाऱ्यांविरोधात दिघी सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. सदरची घटना ५ ऑगस्ट रोजी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

त्यानंतर तौफिकचा एक व्हिडीओ सोशल मिडीवर व्हायरल झाला आहे. त्यामध्ये तो आत्महत्या करणार असल्याचे सांगत आहे. त्याला मारहाण करतानाचा व्हिडीओ देखील सोशल मिडीयावर व्हायरल झाला आहे. पोलिस त्याला त्रास देत असल्याचेही त्यांनी त्या व्हिडीओमध्ये म्हटल्याचे दिसून येते. सध्या तौफिक कोठे आहे याची पोलीस माहिती घेत असल्याचे अपर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे यांनी सांगितले.

शिक्षक संघटनांचा आंदोलनाचा इशारा

मुंबई : अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघाच्या आदेशानुसार बुधवारी (९ ऑगस्ट) देशातील प्रत्येक जिल्ह्यात 'बाईक रॅली'चं आयोजन करण्यात आलं होतं. जूनी पेन्शन लागू करा, या मागणीसाठी ही रॅली काढण्यात आली होती. आपल्या मागणीकडे केंद्र सरकारचं आणि राज्य सरकारचं लक्ष वेधण्यासाठी देशस्तरावर प्रयत्न झाला.

सरकार विरोधात डाव्यांची निदर्शने

। उरण । वार्ताहर ।

केंद्रातील मोदी सरकार राबवित असलेली धोरणे ही जनता विरोधी असून त्यांना सत्तेत राहण्याचा अधिकार नाही. या सरकारला चलेजाव चा नारा देत बुधवारी ऑगस्ट क्रांतीदिनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व त्यांच्या संघटनांनी उरण शहरातील गांधी चौकात जोरदार निदर्शने केली.

यावेळी मोदी सरकार 'चले जाव' चे फलक झळकावत घोषणा देण्यात आल्या. या निदर्शनापूर्वी चारफाटा उरण ते गांधी चौक असा मोर्चा काढून त्यानंतर निदर्शने करण्यात आली. निदर्शनात केंद्रातील मोदी सरकारच्या महिला, युवक, महागाई, बेरोजगारी,कामगार विरोधी कायदे, शेतकऱ्यांचे निर्माण झालेले प्रश्न याला मोदी सरकार राबवित असलेली धोरणे जबाबदार असल्याची भूमिका मांडण्यात आली. यावेळी जेएनपीटीचे माजी कामगार विश्वस्त भूषण पाटील, जनवादी महिला संघटनेच्या रायगड जिल्हाध्यक्ष अमिता ठाकूर, किसान सभेचे महाराष्ट्र राज्य कोषाध्यक्ष संजय ठाकूर, सीआयटीयुचे जिल्हाध्यक्ष मधुसूदन म्हात्रे यांनी आपली मते मांडली.

प्रा.हरी नरके यांचे निधन

। मुंबई । प्रतिनिधी ।

सुप्रसिद्ध लेखक, विचारवंत, समता परिषदेचे उपाध्यक्ष प्रा. हरी नरके यांचे बुधवारी (९ ऑगस्ट) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. मुंबईतील रुग्णालयात त्यांचे निधन झाले. आज त्यांनी वयाच्या ६० व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. मुंबईतील एशिअन हार्ट रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. •> पान २ वर

खरीप कर्ज वाटपात आरडीसीसी अव्वल

। रायगड । प्रतिनिधी ।

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी पैसा उपलब्ध व्हावा, यासाठी जिल्हा सहकारी तसेच राष्ट्रीयकृत बँकांना यंदा ३१७ कोटी ९१ लाख रुपयांचे पीक कर्ज पुरवठा करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले . या उद्दिष्टानुसार जिल्ह्यातील ४० हजार ६३२ शेतकऱ्यांना खरीप कर्ज वाटपाचे नियोजन करण्यात आले होते. जुलैपर्यंत २४ हजार ६६७ सभासद शेतकऱ्यांना १७३ कोटी ८६ लाख रुपयांचे पीक कर्जाचा पुरवठा करण्यात आले आहे. दिलेल्या उद्दिष्टाच्या तुलनेत हे प्रमाण केवळ ६१ टक्के एवढे आहे. असणारे उद्दिष्ट गाठण्यात रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सिंहाचा वाट उचलला आहे. यंदा देखील •> पान २ वर

- जुलैपर्यंत ७० कोटी ८३ लाखांचे कर्ज
- १५ हजार ६६६ शेतकऱ्यांना लाभ

आत्तापर्यंत झालेले कर्जवाटप

आतापर्यंत रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने १५ हजार ६६६ स्वाहसद शेतकऱ्यांना ७० कोटी ८३ लाख रुपयांचे कर्ज वाटप केले. उद्दिष्टाच्या तुलनेत हे प्रमाण ९३ टक्के एवढे आहे. तर राष्ट्रीयकृत बँकांनी ७ हजार २७३ शेतकऱ्यांना ७४ कोटी ९९ लाख रुपयांचे कर्ज वाटप केले आहे. उद्दिष्टाच्या तुलनेत हे प्रमाण ३८ टक्के आहे. व्यापारी बँकांनी १ हजार ७२४ शेतकऱ्यांना २८ कोटी १ लाखांचे कर्ज वाटप केले असून याची टक्केवारी ३७ टक्के आहे. •> पान २ वर

अलिबागमध्ये सापडली धूळ नागीण

। अलिबाग । प्रतिनिधी ।

दोन दिवसांपूर्वी अलिबाग मधील एका पेट्रोल पंपावर पेट्रोल भरायला आलेल्या गाडीतून एक साप बाहेर पडला. लोकवस्तीच्या ठिकाणी साप अथवा अन्य वन्यप्राणी आढळल्यास वाईल्ड लाईफ वॉरियर्स ऑफ अलिबागचे सक्रिय कार्यकर्ते त्यांची सुखरूप सुटका करण्याचे काम गेले चार वर्षे करत आहेत. पंपावरील कर्मचाऱ्यांनी समीर पालकर ह्यांना सदर घटना कळवताच समीर पालकर त्वरित घटना स्थळी पोहोचले आणि त्या सापास सुरक्षितपणे पकडले. त्यावेळी त्यांच्या लक्षात आले की हा साप बँडेड रेसर या जातीचा आहे. हा साप अलिबाग शहराच्या आसपास सापडत नाही. मराठीत ह्याला धूळ नागीण असे म्हणतात. कोरड्या रेताड आणि मोकळ्या माळरानात सापडणारा हा साप खुपसा नागासारखा दिसतो, सरडे, उंदीर आणि लहान पक्षी खाणारा हा साप चुकून गाडीत शिरल्याने अलिबाग मध्ये मिळाला. असे संस्थापक आणि वन्यजीव अभ्यासक डॉ. प्रसाद दाभोळकर ह्यांनी नमूद केले.

गुरुजी म्हणतात, कुठे कुठे शोधू तुला

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शाळाबाह्य, अनियमित आणि स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण विभागाकडून शाळाबाह्य मुलांची विशेष शोध मोहीम राबवली जाणार आहे . रायगड जिल्ह्यातील ३ ते १८ वयोगटातील मुलांचा शोध १७ ऑगस्टपासून घेतला जाणार आहे. पंधरा दिवस असणारी ही मोहीम ३१ ऑगस्टपर्यंत असणार आहे. या मोहिमेमुळे समस्त गुरुजींवर शाळा बाह्य मुले शोधण्याची वेळ आली आहे. ते शोधताना कुठे,कुठे शोधू तुला असे म्हणण्याची वेळही त्यांच्यावर आली आहे.

रायगड जिल्ह्यात प्राथमिक समग्र शिक्षा कार्यक्रमाची तसेच प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत ज्ञानरचनावादी शाळा, कृतीयुक्त अध्ययन पद्धती, डिजीटल शाळा, आय. एस. ओ. मानांकन, मोफत पाठ्यपुस्तक, मोफत गणवेश, मध्यान्ह भोजन, विविध शिष्यवृत्ती शिष्यवृत्ती परिक्षा तयारी, नवोदय परिक्षा तयारी अशा प्रभावी उपक्रमांची अंमलबजावणी अनुभवी व तज्ञ शिक्षकांमार्फत शाळांमध्ये सुरू आहे. शासनाच्या अनेक योजना सुरू असतानाही अद्याप काही बालके शाळाबाह्य असल्याचे निदर्शनास येत आहे. अशा बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन त्यांना प्रवाहात आणण्यासाठी शोध मोहीम राबविण्यात येणार आहे. घरोघरी जाऊन शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करण्यासाठी बसस्थानक, रेल्वेस्थानक, बाजारपेठ, वीटभट्ट्या, दगडखाणी, साखर कारखाने, स्थलांतरित कुटुंबे, मागास, वंचित, सर्व खेडी, गाव, वाडी, तांडे, पाडे, शेतमळे, जंगल, बालगृह, निरीक्षण गृह, विशेष दत्तक संस्था अशा अनेक ठिकाणी जाऊन विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आले आहे.

जिल्ह्यात होणार शाळाबाह्य मुलांचा शोध

सहकार्य करण्याचे आवाहन

शाळाबाह्य मुलांच्या विशेष शोध मोहीम अंतर्गत ३ ते ६ वयोगटातील जी बालके एकात्मिक बाल विकास योजनेचा लाभ घेत नाहीत. खाजगी बालवाडी, इंग्रजी माध्यमांचे ज्युनिअर केजी, सिनिअर केजी मध्ये जात नाहीत व ६ ते १८ वर्ष वयोगटातील शाळाबाह्य बालके यांची शोधमोहिम घेण्यात येणार आहे. या कालावधीत नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांनी केले आहे.

कुरुलकरच्या मोबाईलची तपासणी

। मुंबई । वृतसंस्था ।

डीआरडीओचे संचालक प्रदीप कुरुलकर याने त्याच्या मोबाईलमधील काही ॲप्स डिलीट केले आहे, असा अहवाल पुणे फॉरेन्सिक लॅबोरेटरीने दिला आहे. हे ॲप्स ओपन करुन त्या आणखी कोणती माहिती पाकिस्तानला दिली आहे का? याचा तपास एटीएसला करायचा आहे. त्यासाठी कुरुलकरचा वन प्लस ६टी हा मोबाईल गुजरातमधील फॉरेन्सिक लॅबोरेटरीकडे पुढच्या तपासासाठी पाठवण्याची परवानगी न्यायालयाकडे मागितली आहे. कुरुलकरांच्या जामीन अर्जावर म्हणणं मांडण्यास १८ ऑगस्टपर्यंत मुदत मागून घेतली.

कारभार कुंटे बागेतून, ध्वजारोहण शिवतीर्थावरच!

। रायगड । खास प्रतिनिधी ।

जिल्हा परिषदेची शिवतीर्थ इमारत धोकादायक असल्याने तेथील प्रशासकीय कार्यालये आता कुंटे बाग तसेच अन्य ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आली आहेत. या ठिकाणी असणारा ध्वजस्तंभ, छत्रपती शिवाजी महाराज, रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रभाकरभाऊ पाटील यांचा पुतळा, हुतात्मा स्तंभ आहेत. ते नवीन जागेत स्थलांतरीत करण्यासाठी काही तांत्रिक बाबींची पुर्तता करावी लागणार आहे. त्यामुळे यंदाचा १५ ऑगस्ट रोजी होणारा स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम मात्र शिवतीर्थ इमारतीमध्येच होणार आहे. हा कार्यक्रम कदाचित अखेरचा ठरणार आहे.

इमारत धोकादायक असल्याने ती सध्या खाली करण्यात आली आहे. या ठिकाणी असणारी बहुतांश विभागांची कार्यालये ही विविध जागेमध्ये स्थलांतरीत करण्यात आली आहेत.

विशेष म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय देखील कुंटेबाग येथील जिल्हा परिषद अध्यक्ष यांच्या बंगल्यात नेण्यात आले आहे. त्याचबरोबर सामान्य प्रशासन, ग्रामपंचायत, •> पान २ वर

कुंटेबाग येथे जागा उपलब्ध असली तरी, एवढ्या कमी वेळेत सरकारच्या परवानग्या आणि त्याठिकाणी जागेची स्वच्छता, ती एकसमान करणे तेथे ध्वजस्तंभासह पुतळे उभारणे हे शक्य होणार नाही, शिवतीर्थ इमारतीला अद्याप टाळे लावलेले नाही. या ठिकाणी असणाऱ्या सभागृहात काही बैठक घेण्यात येतात. त्यामुळे १५ ऑगस्ट रोजी झेंडावंदन याच शिवतिर्थ इमारतीच्या ठिकाणी होणार आहे,

- सत्यजीत बडे, अतिरिक्त सीईओ

चार दिवसात ५० अर्जांवर प्रक्रिया

पासपोर्ट कामकाजाला येतोय वेग

प्रमोद जाधव

। अलिबाग ।

अलिबागमध्ये दिर्घ प्रतिक्षेनंतर गेल्या चार दिवसापासून पासपोर्ट कार्यालय सुरु झाले आहे. या पासपोर्ट काढण्यासाठी नागरिकांची लगबग सुरु झाली आहे. या कार्यालयाकडून आतापर्यंत ४०० अर्जांची पडताळणी केली असून २५० अर्जांवर प्रक्रिया झाल्याचे पासपोर्ट कार्यालयाकडून सांगण्यात आले.

अलिबागमध्ये ५ ऑगस्टपासून पासपोर्ट कार्यालय सुरु झाले आहे. या कार्यालयात पासपोर्ट काढण्यासाठी नागरिकांची लगबग सुरु झाली आहे. सुरुवातीला फारसी गर्दी नसल्याचे चित्र पहावयास मिळाले आहे. एका दिवसात ४० कर्मचाऱ्यांची पडताळणी केली जाते. कार्यालयाच्या बाहेर असलेल्या कर्मचाऱ्यांमार्फत कागदपत्रांची पडताळणी केली जाते. त्यानंतर कार्यालयाच्या आतमध्ये असलेल्या तीन टेबलवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांद्वारे अंतिम पडताळणी केली जात आहे. सध्या पासपोर्टसाठी •> पान २ वर

काळ्या फिती

अलिबाग येथील पासपोर्ट कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी बुधवारी दिवसभर काळ्या फिती लावून कामकाज सुरु असल्याचे दिसून आले. यावेळी विचारणा केली असता, शनिवारी सुट्टीच्या दिवशी काम करण्याचे आदेश मंत्रालयाने काढल्याने काळ्या फिती लावून काम करीत असल्याचे सांगण्यात आले आहे. देशभर एकाच दिवशी हा निषेध करण्यात आल्याचे तेथील अधिकाऱ्यांनी सांगितले.

हुतात्म्यांना अभिवादन करण्यास मनाई

। मुंबई । प्रतिनिधी ।

ज्येष्ठ समाजवादी नेते डॉ.जी. जी. पारीख,महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांना बुधवारी ९ ऑगस्ट क्रांती दिनी हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी जाण्यास मनाई करण्याचा प्रयत्न मुंबई पोलिसांनी केला. तुषार गांधी यांना सांताक्रुझ पोलीस स्टेशन येथे बसवून ठेवण्यात आले तर इतर कार्यकर्त्यांना भडकमकर मार्ग पोलीस स्टेशन मध्ये बसवून ठेवण्यात आले.

समाजवादी चळवळीतील कार्यकर्ते दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी सकाळी गिरगाव चौपाटीवर लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यापाशी एकत्र जमून तिथून शांतीमार्च काढीत ऑगस्ट क्रांती मैदानावर जाऊन तेथे हुतात्म्यांना अभिवादन करीत. यंदा शांतता भंग होईल, म्हणून सरकारने पोलिसांच्या माध्यमातून १४९ची नोटीसच दिली नाही तर शांतीमार्च काढण्यास मनाई केली. आणि टिळक पुतळ्या जवळ असलेल्या उपस्थित अनेक कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. यात मधू मोहिते, प्रभाकर नारकर,जगदीश नलावडे,नितीन अणेराव, विश्वास उटगी, दीपक राक्षे, देवी गुजर,विजय तांबे, विजया चौहान, जया तावडे आदी कार्यकर्त्यांचा समावेश होता. आ.वर्षा गायकवाड,भाईजगताप,युवराजमोहिते आदींनी भडकमकर मार्ग पोलीस स्टेशन मध्ये जावून अटक करण्यात आलेल्या या आंदोलकांची भेट घेतली.मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि माजी खासदार डॉ.भालचंद्र मुणगेकर यांनीही मधु मोहिते, विजया चौहान यांची भेट घेवून पोलिसांच्या या दडपशाहीचा निषेध केला आहे.

डॉ.जी.जी.पारीख यांना पोलिसांनी पाठवलेल्या नोटीशी मध्ये आपण किंवा आपल्या हस्तकां करवी कोणत्याही प्रकारचे बेकायदेशीर कृत्य केले त्यामुळे काही अनुचित प्रकार घडून सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेस बाधा निर्माण झाल्यास आपणास जबाबदार धरून कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे नोंदविलेले आहे.शंभरी मध्ये प्रवेश केलेल्या जेष्ठ स्वातंत्र्य सैनिकाशी नोटीस पाठवताना कोणते शब्द वापरायचे याचे भान ठेवणे गरजेचे आहे.डॉ.जी.जी.पारीख यांचे सहकारी,समर्थक,कार्यकर्ते असू शकतात त्यांचे हस्तक कसे काय असू शकतात असे प्रश्न आता कार्यकर्ते विचारीत आहेत.

सावतामाळी पतसंस्थेची सभा

। अलिबाग । वार्ताहर ।

सावतामाळी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्ष श्री रमेष भास्कर नाईक यांचे अध्यक्षेतेखाली क्षात्रैक्य समाज हॉल कुरूळ येथे खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

राज्य सहकारी संघाचे एस.बी. वाटाणे यांनी उपस्थित सभासदांना मार्गदर्शन केले. सभेच्या अजेंडया वरील १३ विशयावर सविस्तर चर्चा झाली. षेवटी उपाध्यक्ष श्री जगदिष कवळे यांनी आभार मानले. सभेला संचालक प्रकाश पाटील, श्रीकांत नाईक, पुष्पा पडते, दयाराम अलिबागकर, हर्शल नाईक, अजय राऊळ, नारायण भगत, अतुल वर्तक, धनंजय बना, आशा घरत, तज्ज्ञ संचालक परशुराम म्हात्रे व शहाजी शिंदे कर्मचारी वर्ग आणि मोठया संख्येने सभासद उपस्थित होते

डोळ्यांची साथ रोखण्यासाठी विद्यार्थ्यांची तपासणी

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.आंबादास देवमाने

। रायगड । खास प्रतिनीधी ।

जिल्ह्यातील काही भागांमध्ये डोळे येण्याची विषाणुजन्य साथ वाढत आहे. शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये हे प्रमाण अधिक असल्याचे दिसत आहे. ॲडिनो वायरस मुळे डोळे येण्याचा आजार होतो. हा आजार ससंर्गजन्य असल्याने आवश्यक काळजी घेणे गरजेचे आहे. याचा अधिक फैलाव होऊ नये यासाठी शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांची तपासणी करण्याची मोहिम आखण्यात येत असल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. आंबादास देवमाने यांनी कृषीवलशी बोलताना दिली.

राज्यातील शहरातील अनेक रुग्णालयातील वार्डात सध्या डोळ्याची साथ आलेल्या रुग्णांची संख्या वाढताना पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे डोळ्याची साथ आल्यास नागरिकांनी स्टेरॉईड आईज् ड्रॉपचा वापर टाळावा असे आवाहन आरोग्य

विभागाने केले आहे. तर डोळ्यांचा त्रास होत असल्यास तत्काळ रुग्णालयात जाऊन उपचार करणे गरजेचे आहे.

अलिबाग हे शहर महानगरांना लागून असलेले शहर आहे. त्यामुळे या ठिकाणी सातत्याने नागिकांची ये-जा सुरु असते. त्यामुळे डोळ्याचा संसर्ग वाढण्यात मदत होत आहे. याचा सर्वाधिक त्रास सध्या शाळेतील विद्यार्थ्यांना होत असल्याचे समोर आले आहे. शहरातील शाळांमधील विद्यार्थ्यांना डोळे येण्याचे प्रमाण आता वाढत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे पालक मात्र चांगलेच चिंतातुर झाले आहेत.

काहीच दिवसांपूर्वी शाळेतील चाचणी परिक्षा संपल्या आहेत. पेपर चुकू नये यासाठी ज्या विद्यार्थ्यांना डोळे आले होते ते शाळेत गेले होते. त्याचा संसर्ग आता वाढल्याचे बोलले जाते.

साथीच फैलाव होऊ नये यासाठी ती रोखण्यासाठी प्रयत्न सुरु करण्यात आले आहेत. ज्या शाळांमध्ये डोळे येण्याचे प्रमाण अधिक आहे. तेथे तज्ञ डॉक्टरांचे पथक पाठवण्यात येणार आहे. संबंधीत डॉक्टर अशा शाळेत जाऊन त्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या डोळ्याची तपासणी करणार आहेत. त्याबाबतचे नियोजन सुरु असून पुढील दोन-तीन दिवसांमध्ये प्रत्यक्ष कार्यवाही करण्यात येणार असल्याकडे डॉ. दवमाने यांनी लक्ष वेधले.

स्टेरॉईडचा वापर टाळा

संसर्ग किंवा ऍलर्जीमुळे डोळे लाल होणे आणि सूज येणे यावर उपचार करण्यासाठी स्टेरॉईड याचा वापर केला जातो. शरीरात जळजळ करणारे पदार्थ बाहेर पडण्यास प्रतिबंध करून ते लालसरपणा, खाज सुटणे यासह वेदना कमी करण्यासाठी याचा वापर केला जातो. तर डोळ्यांच्या आजारासाठी अनेकजण याचा वापर करतात. मात्र, नागरिकांनी स्टेरॉईडचा वापर करू नयेत असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. कारण दीर्घकाळ वापरल्याने याचे डोळ्यावर परिणाम होण्याची शक्यता असते.

डोळे येण्याची लक्षणे

डोळे लाल होणे,वारंवार पाणी गळणे, सुज येणे, चिकट द्रवपदार्थ बाहेरील बाजुस येतो, खाज येणे, डोळे जड वाटतात व डोळयात काहीतरी गेल्यासारखे वाटते.डोळ्याला स्वच्छ पाण्याने सतत धुणे, इतर व्यक्तीचा रुमाल, टॉवेल, कपडे इत्यादीने डोळे पुसु नये, सतत स्पर्श करु नये,घराबाहेर जाताना गॉगल वापरा, नेत्रतज्ञाचा सल्ला घ्यावा, परिसर स्वच्छ ठेवावा,ळा, वसतीगृहे, अनाथालय अशा संस्थात्मक ठिकाणी जर अशी साथ आली असेल तर डोळे आलेल्या मुलाला किंवा व्यक्तीला वेगळे ठेवण्याची गरज आहे. डोळे येणे हा संसर्गजन्य रोग असल्यामुळे एकापासून दुसऱ्या व्यक्तीला वेगाने संसर्ग होतो, त्यामुळे नियमीत हात धुवावेत डॉक्टाराच्या सल्ल्यानुसारच औषधी डोळयात टाकावी डोळे आल्यानंतर स्टेरॉईड आय ड्रॉपचा वापर टाळावा.

गोदी कामगार वेतनकराराचा प्रश्न सुटेल - जलोटा

। मुंबई । प्रतिनिधी ।

भारतातील बंदर व गोदी कामगारांना १ जानेवारी २०१७ पासून नवीन वेतन करार लागू होत आहे, द्विपक्षीय वेतन समितीची चांगली प्रगती असून, या समितीच्या आत्तापर्यंत चार मिटिंग झाल्या आहेत . दोन ते तीन महिन्यांमध्ये वेतन कराराचा प्रश्न निकालात काढू, असे आश्वासन मुंबई पोर्ट प्राधिकरणाचे चेअरमन श्री. राजीव जलोटा यांनी जाहीर सभेत दिले.

मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनच्या वतीने युनियनचा शतकपूर्ती कौटुंबिक सोहळा, हिंद मजूर सभेचा अमृत महोत्सव, डॉ. शांती पटेल यांचा शतक महोत्सव असे औचित्य साधून डॉ. शांती पटेल यांच्या जयंती दिनानिमित्त परेल येथील दामोदर हॉलमध्ये युनियनचा ऐतिहासिक शतकपूर्ती सोहळा ज्येष्ठ कामगार नेते ड. एस. के. शेट्ये यांच्या अध्यक्षतेखाली भव्य आणि दिव्य स्वरूपात संपन्न झाला. याप्रसंगी राजीव जलोटा बोलत होते.

यावेळी हरभजनसिंग सिद्धू,ॲड. एस. के. शेट्ये यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन विद्याधर राणे, दत्ता खेसे यांनी केले तर आभार विजय रणदिवे यांनी मानले.

याप्रसंगी संतोष कोयंडे दिग्दर्शित व गजेंद्र हिरे लिखित कर भला सो हो भला ही लघुनाटिका सांस्कृतिक कार्यक्रम म्हणून दाखविण्यात आली. सुरुवातीला दीप प्रज्वलन झाल्यानंतर गणेश स्तवन, मंगळागौर, पोवाडा व दिंडी असे सांस्कृतिक कार्यक्रम दाखविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश घाडी यांनी केले. यावेळी मान्यवर उपस्थित होते.

सराईत गुन्हेगारांना अटक; १८ गुन्हे उघड

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल, नवी मुंबई व मुंबई परिसरात घरफोडी चोरी करणारे दोन सराईत गुन्हेगार मानपाडा पोलीसांनी अटक केली असून त्यांच्याकडून तब्बल २० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

पोलीस तपास करत असताना आरोपी येण्या जाण्याचे मार्गावरील सीसीटिव्ही फुटेज व इतर तांत्रिक तपास करून तसेच गोपनिय बातमीदाराच्या आधारे अहोरात्र मेहनत घेवून सराईत गुन्हेगार युसुफ रशिद

शेख, आणि नौशाद मुस्ताक आलम उर्फ सागर (वय २८, रा.कामोठे) यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्ह्यासह पनवेल, नवी मुंबई व मुंबई परिसरात केलेल्या १८ घरफोडीचे गुन्ह्यांची कबुली दिली. मानपाडा पोलिसांनी त्यांच्या कडून २०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, २ लाख २० हजार ५०० रूपये रोख रक्कम, २ मोटारसायकल, २ लॅपटॉप, ८ मोबाईल, ५ मनगटी घडयाळ, १ कॅमेरा, १ स्पिकर, १ एटीएम कार्ड, १ नंबर प्लेट, १ हेल्मेट, घडफोडी करण्याकरीता वापरलेले २ लोखंडी कटावणी, स्कु ड्रायव्हर, पकड, व चाकू असा एकुण २० लाख १५ हजाराचा मुददेमाल हस्तगत केला आहे. सदर आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन यापुर्वी त्यांच्यावर पनवेल, कामोठे, तळोजा यांच्यासह नवी मुंबई व मुंबई मधील विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

श्रमजीवीतर्फे वह्यावाटप

। तळे । वार्ताहर ।

श्रमजीवी फॉउंडेशन दहिसर मुंबई तर्फे गरजु व गरीब विध्यार्थना वह्या वाटपाचा कार्यक्रम नुकताच पार पडला. या कार्यक्रमाला श्रमजीवी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष हरेश कावणकर सचिव सुरेश शिगवण, पत्रकार संजय रिकामे, नगरसेवक भास्कर गोळे, नगरसेविका माधुरी घोलप शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा मिरा शिगवण, रायगड भूषण श्रमजीवीचे सल्लागार पुरुषोत्तम मुळे, केंद्र प्रमुख राऊत, शेवाळे, मुख्याध्यापिका सुप्रिया जामकर, सुनील बैकर, मितल वावेकर, सुप्रिया घाडगे, मोरे यांचे सह शाळा समिती सदस्य व विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते. शाळेची प्रगती पाहून समाज सेवक रायगड भूषण कृष्णा महाडिक यांनी कन्याशाळा दुरुस्तीसाठी १२ लाख रुपयांचा आर्थिक मदत केली असून काम सुरु आहे. मुंबई येथील श्रमजीवीतर्फे रायगड जिल्ह्यातील तळा प्राथमिक तारणे आदिवासीवाडी आंबेळी आदिवासीवाडी येथील तीन शाळामधील १५० विद्याथ्यांना ५० डझन वह्याचे वाटप बद्दल त्यांचे मनपूर्वक आभार मानले शेवटी मीतल वावेकर यांनी आभार मानले.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची बिनशेती प्लॉट मिळकत तिचे मालक मे. प्रणित एंटरप्रायझेस तर्फे प्रोप्रायटर सुगंधा विश्वकांत लोकरे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

मौजे-मुद्रे बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती प्लॉट मिळकत

स.नं./हि.नं.	प्लॉट नं.	क्षेत्र	आकार (रू.पै.)
१०/१/ब	२	४.४६.११ आर.चौ.मी. (४४६-११ चौ.मी.)	८-९५

या बिनशेती प्लॉट मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाणापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसात लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील बिनशेती प्लॉट मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १०/०८/२०२३
मोबा. ९८२२६९११०९

ॲड. निलेश कान्हू मोरे
ऑफिस पत्ता : शॉप नं. २९, तळमजला, हिरापन्ना शॉपिंग, प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, आमराई रोड, कर्जत, जि. रायगड ४१०२०१

पान १ वरुन

भारतमातेची हत्या

गांधी यांनी मोदी यांच्यावर जोरदार टीका केली. मी मणिपूरला जाऊ शकतो पण तुम्ही जाऊ शकत नाहीत. कारण तुम्ही मणिपूरमध्ये हिंदुस्थानाची हत्या केली. भाजपाचे लोक हे देशभक्त नाहीत तर देशद्रोही आहेत असंही राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

नरेंद्र मोदी हे देशाचा आवाज ऐकत नाहीत. ते फक्त दोन लोकांचा आवाज ऐकतात. कोणाचं ऐकतात माहित आहे का? रावण दोघांचं ऐकायचा, मेघनाद आणि कुंभकर्ण. त्याचप्रमाणे नरेंद्र मोदी दोघांचंच ऐकतात एक अमित शाह आणि दुसरे अदाणी. लंका हनुमानाने जाळली नाही. लंका रावणाच्या अहंकारामुळे जळाली. रामाने रावणाला मारलं, रावणाच्या अहंकाराने मारलं. तुम्ही सगळ्या देशात आता केरोसीन फेकण्याचं काम करत आहात. आधी तुम्ही मणिपूरमध्ये केरोसीन फेकलं आणि आग लावली. आता तुम्ही हरियाणात तेच करत आहात. संपूर्ण देशात तुम्हाला हेच करायचं आहे. असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

राहुल यांचा फ्लाईंग किस?

धगधगत्या मणिपूरवरून केंद्र सरकारचे वाभाडे काढणारे खासदार राहुल गांधी पुन्हा अडचणीत सापडले आहेत. त्यांनी संसदेत फ्लाईंग किस दिल्याचा गंभीर आरोप केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी केला आहे. आतापर्यंत कुठल्याही खासदाराने असं लज्जास्पद वर्तन सभागृहात केलं नव्हतं. राहुल गांधी यांच्या वर्तनाने आज शरमेने मान खाली गेल्याची टिप्पणी करत महिलांचा अवमान करणाऱ्या राहुल गांधी यांना सभागृहात येण्याचा अधिकार आहे का? असा सवाल स्मृती इराणी यांनी केलाय.

प्रा.हरी नरके यांचे निधन

मागील वर्षभरापासून हरी नरके आजारी होते. त्यांना उपचारासाठी लिलावती रुग्णालयात १५-२० दिवस दाखल करण्यात आले होते. त्यानंतर एक-दोन महिन्यापूर्वी राजकोट येथील रुग्णालयात गेले होते. तिथे त्यांची प्रकृती स्थिर झाली होती.

आज ते मुंबईला येत असताना प्रवासात सहा वाजताच गाडीत त्यांना दोन उलट्या झाल्या. त्यानंतर समीर भुजबळ यांनी ड्रायव्हरला एशियन हार्ट घेऊन जाण्यास सांगितलं, अशी माहिती छगन भुजबळ यांनी दिली आहे. प्रा. हरी नरके यांनी विपुल लेखन केले आहे. महात्मा फुले-शोधाच्या नव्या वाटा, महात्मा फुले यांची बदनामी : एक सत्यशोधन, हे त्यांचे पुस्तके प्रसिद्ध आहे. फेब्रुवारी २०११ पासून ते ब्लॉग लिहितात. सोशल मीडियावर ते सतत सक्रीय होते. अनेक सामाजिक विषयांवर ते थेट भाष्य करत असतं. हरी नरके यांनी मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या गटाला आपल्या ब्लॉगमधून आधार दिला होता. त्यांचे अनेक लेख काही वर्तमानपत्रांतही प्रसिद्ध झाले आहेत.नरके यांच्या निधनाबद्दल राजकीय,सामाजिक,साहित्य क्षेत्रातील मान्यवरानी शोक प्रकट केला आहे.

...ध्वजारोहण शिवतीर्थावरच!

स्वच्छता व पाणी पुरवठा, समाज कल्याण अशी अन्य कार्यालये देखील याच ठिकाणी आणण्यात आली आहेत. प्रशासकीय कारभार सध्या अशा विविध ठिकाणाहून सध्या हाकला जात आहे. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम कोठे होणार याबाबत बऱ्याच चर्चा रंगत होत्या, परंतु स्वातंत्र्य दिनी होणारा झेंडावंदनाच्या कार्यक्रम हा शिवतिर्थ या मुळ इमारतीमध्येच होणार आहे. या ठिकाणी असणारा ध्वजस्तंभ, छत्रपती शिवाजी महाराज, रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रभाकरभाऊ पाटील यांचा पुतळा, हुतात्मा स्तंभ आहेत. ते नवीन जागेत स्थलांतरीत करण्यासाठी काही तांत्रिक बाबींची पुर्तता करावी लागणार आहे. काही कालावधीनंतर सरकारच्या सर्व परवानग्या मिळून कुंटे बाग येथील जागेत ध्वजस्तंभ उभारण्यात येईल. तेव्हा मात्र असे सरकारी कार्यक्रम नवीन जागेत पार पाडावे लागार आहेत. त्यामुळे या वर्षी होणार स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम कदाचीत शेवटचा ठरण्याची शक्यता आहे.

रायगडवासियांना पासपोर्टचे वेध

फारसी गर्दी नसल्याने उपलब्ध तीन कर्मचाऱ्यांमार्फत पडताळणीची कामे होत आहेत. प्रत्येक नागरिकांना पडताळणीसाठी अर्धा तास लागत असल्याने फारसा उशीर होत नसल्याचे पहावयास मिळत आहे.

दरम्यान पासपोर्ट काढण्यासाठी आलेल्या एका व्यक्तीशी संवाद साधला. ते श्रीवर्धन तालुक्यातील असून त्यांचे नाव इरफान असल्याचे सांगितले. ते म्हणाले, अलिबागमध्ये पासपोर्ट कार्यालय आल्याने खुप आनंद आहे. पुर्वी ठाण्यामध्ये पासपोर्ट साठी जावे लागत असल्याने खुप त्रास झाला होता. मात्र आता अलिबागमध्ये पासपोर्ट कार्यालय सुरु झाल्याने समाधान व्यक्त केले जात असल्याचे त्याने कृषीवलशी बोलताना सांगितले. पासपोर्ट अधिकाऱ्याशी संवाद साधल्यावर त्याने २६ जूलैपासून ते आजपर्यंत ४०० जणांची तपासणी केली आहे. २५० जणांचे प्रक्रीया पुर्ण झाल्याची माहिती दिलीआहे. दिवसाला ४० जणांची पडताळणी केली जात असून सध्या कार्यरत कर्मचाऱ्यांद्वारे योग्य पध्दतीने काम चालत असल्याचे त्यांनी सांगितले.

पासपोर्टसाठी लागणारे कागदपत्रे

आधार कार्ड, पॅनकार्ड,शाळा सोडल्याचा दाखला,जन्माचा दाखला, मार्कलिस्ट ई आधारकार्ड मान्यता

अधार कार्ड हे महत्वाचे मानले जाते. स्मार्ट कार्ड म्हणून प्रत्येकाच्या खिशात अधारकार्ड ठेवला जातो. परंतु पासपोर्टसाठी सही असलेले पुर्ण अधारकार्डला मान्यता आहे. फक्त स्मार्टकार्ड असेल तर ते ग्राह्य धरले जाणार नसल्याचे तेथील कर्मचाऱ्याकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे ई अधारकार्ड सही असलेल्या अधारकार्डलाच मान्यता असल्याचे समोर आले आहे.

अलिबागमध्ये आदिवासींचा मोर्चा

अतिदरड प्रवण क्षेत्रात सुविधा उपलब्ध कराव्यात तसेच पुनर्वसन करण्यात आले. अशा अनेक प्रकारच्या मागण्यांसाठी आदीवासी समाजाने मोर्चा काढला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, एसटी स्थानक, बालाजी नाका, कर्वे रोड व जिल्हाधिकारी कार्यालयपर्यंत ही रॅली काढण्यात आली.

खरीप कर्ज वाटपात आरडीसीसी अव्वल

आरडीसीसी बँकेने कर्ज वाटपात अव्वल राहून आतापर्यंत १५ हजार ६६६ शेतकऱ्यांना कर्ज वाटप केले आहे.

खरीप हंगाम शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असतो. जिल्ह्यामध्ये मागील काही वर्षात खरीप हंगामाचे पिकाखालील सरासरी क्षेत्र १ लाख ५ हजार ६२० हेक्टर असून यंदा ४ हजार ९८९ हेक्टरवर पेरणी करण्यात आली आहे. खरीप हंगामासाठी खरिपाची भात , नागली , वरई , तूर , भाजीपाला , आणि इतर पिकांची बियाणे आणि खत शेतकऱ्यांना मिळावी यासाठी शेतकऱ्यांना कर्ज वाटप करण्यात आले आहे. यामध्ये जिल्हा बँकेला खरीप हंगामासाठी ११९ कोटी २७ लाख रुपयांचे पीक कर्जवाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. राष्ट्रीयकृत व खासगी व्यापारी बँकांना १९७ कोटी ७४ लाख रुपयांचे पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.असे रायगड जिल्ह्यातील ३९ प्रकरच्या राष्ट्रीयकृत बँका आणि खाजगी बँकाना ३१७ कोटी ९१ लाख रुपयांचे खरीप पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

खरीप हंगामात पेरणीसाठी शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते आणि शेतीसाठी पैशांची गरज भासते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना पीक कर्जाची नितांत गरज असते . जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत, ग्रामीण, व्यापारी व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत १ एप्रिल ते ३० सप्टेंबर २०२३ या कालावधीत खरीप पीक कर्जाचे वाटप सुरु असते . जून- २०२३ अखेर खरीप पिक कर्ज वाटपाचे १०० टक्के उद्दिष्ट सर्व बँकांनी विशेषत: राष्ट्रीयकृत बँका आणि खाजगी बँका यांनी पूर्ण साध्य करण्याची दक्षता घेण्याचे आदेश जिल्हा प्रशासनामार्फत देण्यात येतात . परंतु पीक कर्ज वाटपाची प्रक्रिया ३० सप्टेंबर पर्यंत सुरु राहते. यंदा जुलै संपून ऑगस्टचा पहिला पंधरवडा संपत आला तरी पीक कर्ज वाटपाचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण झालेले नाही.

आत्तापर्यंत झालेले कर्जवाटप

असे मिळून जुलै अखेरपर्यंत जिल्ह्यातील २४ हजार ६६७ सभासद शेतकऱ्यांना एकूण १७३ कोटी ८६ लाख रुपयांचे पीक कर्जाचे वाटप करण्यात आले आहे. एकूण उद्दिष्टाच्या तुलनेत हे प्रमाण ६१ टक्के एवढे आहे, अशी माहिती जिल्हा अग्रणी बँकेने दिली आहे.

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क-

८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

श्रीमती द्रौपदी धर्मा कदम, स्मरणार्थ अलिबाग,

झोया शेख, वाढदिवस, अलिबाग

श्री. सुचेता कृष्णाजी रहाटाडकर, अलिबाग

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

SRM E-TENDER EXTENSION NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification.

Sr. No.	Tender / Notice No.	Particulars of Tender	Estimated Cost of Tender
1	**Tender No.:** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech/E-Tender No. 30/ 2023-24 Dt. 02.08.2023 **RFx No. 7000028127**	**Sub.:** Extension for SRM E-Tender for the Supply of Hot Stick & Discharge Rod at various Substations under EHV (O&M) Division, Mahad.	Up to Rs. 4,90,101/- (Including GST)

EMD will be the 1% of the Estimated Cost or Rs. 5,000/- whichever is higher
Tender Fee will be Rs. 500/- plus GST + 1% Labour Cess.
Bid Submission: From 02.08.2023 @ 00:00 Hrs to 08.08.2023 @ 23:59 Hrs & **Further Extended Up to** 16.08.2023 @ 23:59 Hrs for above tender. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
Contact Person: The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 7373101089
Note: All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
EHV (O&M) Dn., Mahad

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

PUBLIC NOTICE

The following Power Consumers under 100kV Taloja Substation in EHV (O&M) Dn., Panvel are informed that, the power supply of the following power lines will be shut down on Friday Dt. **11.08.2023** for maintenance and repair work for the time indicated below. Please co-operate.

Sr. No.	Substation	Feeder No.	Date & Time	Areas
1	100/22KV Taloja	BEL-2	On 11.08.2023 From: 09:00 Hrs to 17:00 Hrs	Bharat Electronics Company
2		22kV Old Panchnand		TALOJA PH-1
3		22kV HTW		Rexam Company
4		22kV MIDC-1		Chemical Zone
5		New Kalamboli		Kalamboli City
6		22kV MIDC-5		Engineering Zone
7		22kV MIDC-4		New Chemical Zone
8		22kV Apcotex		Apcotex Company
9		22kV BEL-1		M Plot
10		22kV MIDC-2		New Chemical Zone
11		22kV Wawanja		Kanpoli Pale Budruk Valap Village
12		22kV Navada Switching		Devicha Pada Chindaran, Ghot Nithalaj Wawanja Village
13		22kV New Panchnand		TALOJA PH-2

Sd/-
Executive Engineer
EHV (O&M) Dn., Panvel

नि व ड क

नागोठण्यात स्वाक्षरी मोहीम

शिहू : शिवसेना रायगड जिल्हा सहसंपर्क प्रमुख किशोर जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत महामार्गावरील खड्डेमय रस्त्याच्या निषेधार्थ स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. यावेळी कार्तिक जैन, संजय भोसले, मिलिंद धात्रक, दर्शना जवके, धनवंती दाभाडे, प्रणव रावकर, दिनेश वादळ, प्रशांत भोईर, ऋत्विज माने, ज्ञानेश्वर शिर्के, संजय महाडिक, प्रकाश कांबळे, बळीराम बडे, राजेंद्र वालंज, संजय कनघरे, दिपक पाटील, लक्ष्मण खाडे, मोहन पाटील उपस्थित होते.

रेल्वे सेवा आवश्यक

माणगाव : दक्षिण रायगडातील लोकांना मुंबईत सकाळी लवकर पोहचण्यासाठी सकाळी ६ वाजता वीर ते पनवेल रेल्वेगाडी कशी सुरु होईल याकडे रायगड लोकसभा मतदार संघाचे खा. सुनील तटकरे यांनी जातीने लक्ष घालावे, अशी मागणी केली जात आहे. सकाळी ६ वाजता वीर ते पनवेल अशी रेल्वेगाडी सुरु करण्यात आली तर या सर्व प्रवाशांचे अनेक प्रश्न सुटतील आणि प्रवासही सुखकर होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

महावितरणवर मोर्चा

चौक : अनेक दिवस चौक तसेच आजूबाजूच्या परिसरात कोणत्याही वेळी सूचना न देता सकाळी सहा वाजल्यापासून दिवसभरासाठी वारंवार लाईट खंडित होत आहे. याची दखल घेत चौक माजी उपसरपंच गणेश खंडू कदम, यांनी विद्युत मंडळाच्या कार्यालयात जाऊन यापुढे जर विद्युत पुरवठा सुरळीत सुरू न झाल्यास कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे एका पत्रकांद्वारे कळविण्यात आले आहे.

उलागडे सेवानिवृत्त

माणगाव : सार्वजनिक बांधकाम कार्यालय अधिकारी शिवलिंग उलागडे नुकतेच सेवानिवृत्त झाले. बांधकाम विभागाचे कर्मचारी, बिल्डर असोसिएशनचे पदाधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने ॲड. राजीव साबळे तसेच सा. बां. सहाय्यक अभियंता श्रीकांत गणगणे तसेच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचे कौतूक केले. तसेच त्यांना शुभेच्छाही दिल्या.

कृषी विभागातर्फे रॅली

तळा : खांबवली येथे कृषी विभागातर्फे मीलेट रॅलीचे आयोजन करण्यात आले होते व पौष्टिक तृणधान्य महत्व याविषयी परिसंवादाचे देखील आयोजन करण्यात होते. कृषी सहाय्यक दिनेश चांदोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली मीलेट रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी आनंद कांबळे, सचिन जाधव, निकिता गायकवाड, जनाबाई कोळी, दिनेश चांदोरकर, विनोद तुपे शिक्षक, शीला बिऱ्हाड उपस्थित होते.

घोट येथे भूसंपादनावरुन तणाव

। पनवेल । वार्ताहर ।

मौजे घोट येथील शेतकऱ्यांच्या आजोबांनी विकत घेतलेल्या जमिनीचा गैर पद्धतीने तब्बल ५८ वर्षांनंतर व्यवहार केला असल्याचा प्रकार समोर आला आहे. यावेळी भू संपादन अधिकाऱ्यांच्या मोजणीला शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला. सदर प्रकरणात मूळ मालकाचे वारसदार आणि नव्याने खरेदी करणारे देखील याठिकाणी आले होते. तसेच तळोजा पोलीस ठाण्याच्यावतीने काही अघटित घडू नये म्हणून पोलीस बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला होता.

मोजणीला शेतकऱ्यांनी केला विरोध

> प्रत्यक्षात सदर जमिनीचा दुसऱ्यांदा व्यवहार होत असल्यामुळे मूळ मालकाच्या नातवाने कायदेशीर गुन्हा केला आहे.
> - दिलीप पाटील, शेतकरी

याबाबत पनवेल न्यायदंडाधिकारी यांच्याकडे दाद मागण्यात आली असून सदर प्रकरण न्याय प्रविष्ट असतानाही भू संपादन करण्याचा घाट येथील अधिकाऱ्यांना हाताशी धरून मूळ जमीन मालक यांचे नातू यांनी केला असल्याचा आरोप शेतकऱ्यांसह ग्रामस्थांनी केला आहे. याबाबत भूसंपादन अधिकाऱ्यांनी जागेच्या मोजणीबाबत नोटीस ३ ऑगस्ट रोजी काढल्या मात्र त्या नोटीस शेतकऱ्यांपर्यंत किंवा चतुर्भुज असलेल्या शेतकऱ्यांपैकी एकालाही मिळाली नाही. यावरून घोट गावातील लगतचे शेतकरी आणि ग्रामस्थ या मोजणीला विरोध करण्यासाठी एकवटले. अखेर भूसंपादन अधिकाऱ्यांनी नोटीस न मिळाल्याच्या कारणावरून मोजणीला विरोध असल्याचा पंचनामा तयार करून त्यावर ग्रामस्थांच्या सह्या घेवून पुढील मोजणीची तारीख १० दिवसात ठरविली जाईल असे सांगितले.

आगरी कोळी समाजाचे नेते राजाराम पाटील याठिकाणी उपस्थित होते. त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरत सांगितले की, कसेल त्याची जमीन हा कुळ कायदा बाबासाहेबांनी अंमलात आणला तोच मुळात शेतकऱ्यांच्या हितासाठी. आज शेतकऱ्याने याठिकाणी ती जमीन कसली सुद्धा आहे आणि पैसे देवून विकत सुद्धा घेतली आहे. जुन्या लोकांच्या अज्ञानपणामुळे त्यांना कायदेशीर बाबी माहीत नव्हत्या. रजिस्ट्रार कार्यालयातील नोंद म्हणजे. सर्व काही आहे, अशी समज असल्यामुळे त्यांनी याबाबींकडे लक्ष दिले नाही. अनेक वर्षे उलटली. त्यांची तिसरी पिढी सुद्धा आता याठिकाणी भातशेतीचे काम करीत आहे. आणि अशावेळी या शेतकऱ्यांना त्रास देणे उचित नाही. त्यामुळे आपण या शेतकऱ्यांसह चतूर्सिमा असलेले शेतकरी मोजणीला विरोध करीत आहेत, याचा उल्लेख आपल्या रिपोर्टमध्ये करावा अशी विनंती त्यांनी केली.

त्यानुसार भूसंपादन अधिकाऱ्यांनी मोजणीला विरोध होत आहे याचा उल्लेख केला मात्र यामध्ये देखील त्यांनी पळवाट काढण्याची यत्किंचतही संधी सोडली नाही. शेतकऱ्यांनी याठिकाणी मोजणी करण्यासाठी कायमस्वरूपी विरोध दर्शविला असतानाही भू संपादन अधिकाऱ्यांनी मात्र नोटीस न मिळाल्याचे कारण देत विरोध असा भाषेचा खेळ करून शेतकऱ्यांची दिशाभूल केली असल्याचा आरोप समाजाचे नेते राजाराम पाटील यांनी केला आहे. यावेळी मोजणी अधिकारी आणि पोलीस अधिकारी सदर जमीन ताब्यात घेण्यासाठी आलेले पाहून तिथले आसपासचे शेतकरी याठिकाणी जमा झाले. यावेळी या शेतकऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना ही जमीन बळीराम मंगल पाटील आणि त्यांच्या भावकीची असून आज पर्यन्त तेच याठिकाणी जमीन कसत आले आहेत, असेही ग्रामस्थांसह लगतच्या शेतकरी बांधवांनी सांगितले.

१९६५ साली घोट येथील शेती ही पनवेलमधील खतीजाबिबी दाऊदसाहेब पटेल यांच्याकडून चांग्या विठू पाटील यांनी खरेदीखत करून विकत घेतली. मात्र अज्ञानपणामुळे त्यांनी सदर जमिनीचे सात बारा उतारे बनविले नाहीत. आणि ५८ वर्षे त्यांच्यासह त्यांचे उत्तराधिकारी हे जमिनीत शेती करीत राहिले. पटेल यांच्या नातवाला या जागेचा सात बारा आपल्याच नावाने असल्याचे लक्षात आल्यानंतर त्याने येथील जागांचे वाढते भाव लक्षात घेता परस्पर तिसऱ्यालाच विकण्याचा प्रताप केला. तर सदरची जागा ही विकत घेणार हे वर्षानुवर्षे कसत असल्याची कागदपत्रे बनविली आणि सातबाऱ्यावर नावे देखील चढवून घेतली. ही बाब बळीराम पाटील आणि. कुटुंबियांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी याबाबत सरकारी दप्तरे झिजविण्यास सुरुवात केली.

ऑक्सिजन पार्क येथे सेल्फीझोन

। उरण । वार्ताहर ।

सारडे विकास मंच तर्फे विकसित करण्यात आलेल्या कोमनादेवी ऑक्सिजन पार्क सेल्फीझोनची निर्मिती करण्यात आली आहे. देवेंद्र पाटील, शशिकांत पाटील यांनी येणाऱ्या पर्यटकांसाठी सेल्फीझोनची निर्मिती केली आहे. उरणमधील मॉर्निंग वॉकच्या द्रोणागिरी लिव लाईफ ग्रुपचे गोपाळ पाटील, घन:श्याम कडू, रमेश म्हात्रे आणि सहकारी यांच्या हस्ते या सेल्फीझोनचे पार उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी नागेंद्र म्हात्रे, हरीश म्हात्रे-खोपटे, हरीश म्हात्रे पाले, संतोष जोशी, सचिन पाटील, विनायक गावंड, तुकाराम गावंड आदी निसर्गप्रेमी उपस्थित होते. तसेच त्रिजन पाटील, रोहित पाटील,निल दानिश,निरव,विभा, सई या सर्वांचं सहकार्य लाभले नागेंद्र म्हात्रे यांनी सर्वांचे आभार मानले.

आश्रमशाळेत क्रांतिदिन साजरा

। चिरनेर । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील चिरनेर आदिवासी आश्रम शाळेत ९ ऑगस्ट या क्रांती दिनाचे औचित्य साधून, क्रांतिदिन आणि आदिवासी दिन साजरा करण्यात आला. आरंभी विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आश्रमशाळा ते हुतात्मा स्मारक अशी प्रभात फेरी काढून हुतात्मा चौकातील हुतात्म्यांच्या शिल्पचित्र स्मृतींना अभिवादन केले. या कार्यक्रमात माझी माती माझा देश या उपक्रमांगत कार्यक्रमात पंचप्राण शपथ घेण्यात आली. पंचप्राण शपथेचे वाचन साधना शिंदे यांनी केले. त्यानंतर देशासाठी बलिदान देणाऱ्या १३ आदिवासी बांधवांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आणि त्यांनी केलेल्या त्यागाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. कार्यक्रमाला अशोक कांबळे, आप्पासाहेब मोरे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव डोईफोडे यांनी केले.

मुरुडमध्ये क्रांतिदिन साजरा

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

मुरुड शहरातील गणेश आळी नाक्यावर क्रांति दिनानिमित्त सर एस.ए. हायस्कूलाच्या विद्यार्थ्यांनी सकाळी प्रभात फेरी काढून क्रांती स्तंभा जवळ येऊन मानवंदना दिली. तद्नंतर क्रांती स्तंभास माजी नगरसेवक -प्रमोद भायदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी भारत माता की जय, जय जवान जय किसान,वंदे मातरम्, छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, क्रांतिदिनांचा विजय असो अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी मुख्याध्यापक -सरोज राणे, दिपक पालशेतकर, रिझवान उलडे, पांडुरंग आरेकर सर्व शिक्षक-शिक्षिका, विद्यार्थी बहुसंखेने उपस्थित होते.

हुतात्मा स्मारकात अभिवादन

। नेरळ । प्रतिनिधी ।

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून जाहीर झालेल्या 'मेरी मिट्टी मेरा देश' या उपक्रमाचे क्रांति दिनी शुभारंभ करण्यात आला. मानिवली येथे हुतात्मा हिराजी पाटील यांच्या स्मारकात आयोजित करण्यात आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते या अभियानाला सुरुवात तसेच हुतात्म्यांना अभिवादन या कार्यक्रमचे आयोजन करण्यात आले होते.

आ.महेंद्र थोरवे यांच्या हस्ते हुतात्मा हिराजी पाटील यांना पुष्पचक्र वाहून अभिवादन करण्यात आले. त्याचवेळी राष्ट्रध्वज फडकावून क्रांती दिन साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, तालुका तहसीलदार शीतल रसाळ, पंचायत समितीचे प्रशासक चंद्रकांत साबळे, शिक्षक अधिकारी संतोष दोंड, सरपंच तुषार गवळी, माजी सभापती राहुल विषे, माजी उप सभापती अरविंद पाटील यांच्यासह कर्जत तालुक्यातील सर्व प्रमुख शासकीय अधिकारी उपस्थित होते.

चिरनेर जंगल सत्याग्रहातील स्वातंत्र्यवीरांना अभिवादन

। चिरनेर । वार्ताहर ।

जंगल सत्याग्रहातील स्वातंत्र्यवीरांना ९ ऑगस्ट या क्रांतिदिनी ग्रामपंचायत प्रशासन, ग्रामस्थांमार्फत मानवंदना देण्यात आली. यावेळी उभारण्यात आलेल्या शूरवीरांच्या पूर्णाकृती शिल्पचत्रांना आणि स्मृतीस्तंभाला पुष्पमालिका अर्पण करून, स्वातंत्र्य वीरांच्या पराक्रमाच्या शौर्याला मानवंदना देण्यात आली. यावेळी 'माझी माती माझा देश' या कार्यक्रमांतर्गत पंचप्राण शपथ घेण्यात आली. या शपथेचे वाचन चिरनेर ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी महेश पवार यांनी केले.

यावेळी उपसभापती शुभांगी पाटील, पोलीस पाटील संजय पाटील, ग्रामविकास अधिकारी महेश पवार, मानसी म्हात्रे, सचिन घबाडी, परशुराम रेवसकर, हिराजी ठाकूर, कांचन मोकल, संताजी ठाकूर, सुनील ठाकूर, तसेच ग्रामस्थ प्राथमिक शाळेचे विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक व अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.

कर्मचारी लागले कामाला; मतदारयादी बनवण्याची लगबग सुरु

सरकारी यंत्रणेला निवडणुकीचे वेध

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मुदत संपणाऱ्या रायगड जिल्ह्यातील २७६ ग्रामपंचायतीच्या मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसह महसूल कर्मचारी मतदारांची यादी तयार करण्याच्या कामाला लागले आहे. अलिबागसह जिल्ह्यातील तहसील कार्यालयात या कामाची लगबग असल्याचे चित्र पहावयास मिळाले.

राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार,जानेवारी ते डिसेंबर २०२३ या कालावधीमध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक तसेच निधन, राजीनामा, किंवा इतर कारणांमुळे ग्रामपंचायत सदस्यांच्या रिक्त झालेल्या जागांच्या निवडणुका तसेच पोटनिवडणुकांसाठी पारंपारिक पद्धतीने राबविण्यात येणारा मतदार यादीचा सुधारित कार्यक्रम जाहीर झाला आहे. रायगड जिल्ह्यामध्ये २७६ ग्रामपंचायतींची निवडणूक होण्याची शक्यता आहे.त्यात अलिबाग तालुक्यातील १८, मुरुडमधील १८, पेणमधील १४, पनवेलमधील १८, उरणमधील पाच, कर्जतमधील १०, खालापूरमधील २३, रोहामधील १७, सुधागडमधील १४, माणगावमधील ३४, तळामधील ११, महाडमधील ३९, पोलादपूरमधील २४, श्रीवर्धनमधील १४ व म्हसळामधील १७ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. यामध्ये २०७ ग्रामपंचायतीची सार्वत्रिक व ६९ ग्रामपंचायतींची पोट निवडणूक घेतली जाणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार मतदार यादी तयार करण्याचे काम गेल्या अनेक दिवसांपासून जिल्ह्यातील तहसील कार्यालयात सुरू आहे. तहसील कार्यालय अलिबाग येथे अलिबाग तालुक्यातील १५ ग्रामपंचायत आणि तीन पोटनिवडणुका असलेल्या ग्रामपंचायतीची पारंपारिक पद्धतीने मतदार यादी बनवण्याचे काम तहसील कार्यालयातील जंजिरा सभागृहात गेल्या अनेक दिवसांपासून केले जात आहे. १० ऑगस्टला प्रारुप यादी प्रसिध्द केली जाणार आहे. त्यानुसार ग्रामपंचायत कर्मचारी व महसूल कर्मचारी कामाला लागले असल्याचे दिसून येत आहे. प्रारुप यादी प्रसिध्द केल्यानंतर २१ ऑगस्टपर्यंत त्यावर हरकती मागविल्या जाणार आहेत. त्यानंतर २५ ऑगस्टला अंतिम यादी प्रसिध्द केली जाणार आहे.

> तालुक्यातील १५ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक व तीन ग्रामपंचायतीच्या पोट निवडणूका होणार आहेत. त्यानुसार मतदार यादी तयार करण्याचे काम गेल्या अनेक दिवसांपासून सुरु आहे. दहा ऑगस्टपर्यंत प्रारुप मतदार यादी प्रसिध्द केली जाणार आहे. त्यानुसार ग्रामसेवक, तलाठी यांच्यामार्फत मतदार यादीचे काम वेगात सुरु आहे.
> विक्रम पाटील - तहसीलदार, अलिबाग

महाराष्ट्र शासन | आज़ादी का अमृत महोत्सव | G20 भारत 2023 INDIA | Maharashtra State Innovation Society

नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज

विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी शासनाचा उपक्रम

राज्यातील सर्व महत्त्वाकांक्षी विद्यार्थ्यांना निमंत्रण
तुमच्याकडे नाविन्यपूर्ण संकल्पना असल्यास नक्की सहभागी व्हा

विशेष प्राधान्य
- महिला नवउद्योजक
- ITI विद्यार्थी व विद्यार्थिनी
- वन डिस्ट्रिक्ट - वन प्रोडक्ट

पारितोषिके
- तालुकास्तरावर ३ विजेत्यांना रोख बक्षिसे
- जिल्हास्तरावर १० विजेत्यांना प्रत्येकी रु. १ लाख व राज्यस्तरीय १० विजेत्यांना रु. ५ लाखांचे बीज भांडवल
- शैक्षणिक संस्था व जिल्ह्यांनाही पारितोषिके

अधिक माहितीसाठी www.msins.in ला भेट द्या

शैक्षणिक संस्थासाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२३
विद्यार्थ्यांसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख १५ सप्टेंबर २०२३

देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री | एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री | अजित पवार, उपमुख्यमंत्री | मंगलप्रभात लोढा, मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन

मणिपूरच्या नावाने..

मणिपूरमधील जनता आज पुन्हा एकदा रडत असेल. गेले तीन महिने ती मार-काट, दंगे, जाळपोळ पाहत आहे. आता त्या मणिपूरच्या नावाने लोकसभेत मंगळवारपासून तसाच दंगा सुरु झाला आहे. या प्रश्नावर विरोधकांनी केंद्र सरकारविरुद्ध अविश्वास ठराव मांडला आहे. त्या निमित्ताने या प्रश्नाची गंभीर चर्चा व्हावी अशी अपेक्षा होती. विरोधकांपैकी अनेक नेत्यांनी तशी भाषणे केली. मात्र सत्तारुढ भाजपचे सर्वच नेते सध्या इतके सत्तांधळे आणि मोदी-आंधळे झाले आहेत की, रस्त्यावरच्या मवाल्यांसारखी भाषा वापरत ते विरोधकांवर तुटून पडत आहेत. यापैकी खूपच कमी लोक मणिपूरच्या समस्येबाबत बोलण्याचे कष्ट घेत आहेत. आपल्या नावाने चाललेला हा तमाशा पाहून मणिपूरच्या जनतेला असह्य होत असेल. मणिपूर हे देशाच्या सीमेवरचे एक संवेदनशील राज्य आहे. मे महिन्यापासून तेथे अक्षरशः यादवी चालू आहे. बहुसंख्येने असलेले मैतेई आणि अल्पसंख्य कुकी या जमातींमधील हा संघर्ष आहे. कुकी हे आदिवासी डोंगराळ भागात राहतात. मैतेई हे इम्फाळ या राजधानीच्या खोऱ्यात राहतात. आता मैतेईंना कुकींप्रमाणे आदिवासींचा दर्जा मिळवून आरक्षण तसेच जमिनी खरीदण्याचे अधिकार हवे आहेत. यावरून पेटलेल्या या संघर्षात दोन्ही बाजूंचे लोक होरपळून निघत आहेत. दोन्ही बाजूंनी लष्कर किंवा पोलिसांकडील हजारो शस्त्रे पळवली आहेत किंवा त्यांना ती देण्यात आली आहेत. या शस्त्रांमध्ये एके-४७ सारख्या रायफल्स इत्यादी आहेत. एक समुदाय दुसऱ्याच्या हद्दीत पाऊल टाकू शकत नाही अशी स्थिती आहे. शेजारी म्यानमार आहे. चीनचा या सर्व भूभागावर डोळा आहेच. अशा स्थितीत केंद्राने वेळीच हस्तक्षेप करून हा प्रकार रोखायला हवा होता. पण राज्यातील बिरेनसिंग यांचे भाजपचे सरकार उघडपणे मैतेईंना पाठीशी घालत आहे. आणि नरेंद्र मोदी यांच्या सरकारने बिरेनसिंग यांना अभय दिले आहे. एरवी देशभक्तीच्या बाता करणारे भाजपवालेच मणिपूरला यादवीच्या खाईत लोटत आहेत.

मोदींचा अहंकार

विरोधकांनी किंवा आंदोलकांनी एखादी मागणी केली की ती मान्य करायची नाही अशी नरेंद्र मोदी सरकारची रीत आहे. अशी मागणी मान्य करणे म्हणजे सरकारचे झुकणे होय असा त्याचा विचित्र समज झाला आहे. पंतप्रधानांनी मणिपूरविषयी बोलावे आणि राज्याचा दौरा करावा अशी मागणी बरेच दिवस विरोधक व सामाजिक कार्यकर्ते करीत आहेत. पण मोदी यांचा अहंकार भयंकर झाला आहे. अन्य कोणी काही सांगितले आणि मी ते केले असे दिसणे म्हणजे आपल्या नेतेपदाला कमीपणा आला असे त्यांना वाटते. त्यामुळे ते कटाक्षाने या विषयावर बोलणे टाळत आहेत. हेच मोदी मनमोहनसिंगांना मौनीबाबा म्हणून हिणवत असत. पण मनमोहनसिंग यांनी अनेक पत्रकार परिषदा घेतल्या आणि कोणतेही आरोप झाल्यानंतर तात्काळ त्याबाबत चौकशा नेमल्या. कारवाई केली. आपल्याच सरकारला फटका बसेल याची पर्वा केली नाही. मोदी आणि त्यांच्या भक्तांचे नेमके उलट आहे. मोदींचा अहंकार, प्रतिमा आणि भाजपची सत्ता वाचवण्यासाठी ते कोणत्याही थराला जायला तयार आहेत. लोकसभेत मंगळवार व बुधवारी त्याचेच दर्शन घडले. राहुल गांधी यांच्या भाषणात वारंवार अडथळे आणण्यात आले. राहुल हे आपल्या मणिपूर दौऱ्यात असंख्य सामान्य लोकांना भेटले. त्यातील मुलगा मारल्या गेलेल्या महिलेची कहाणी ते सांगत असताना भाजपचे काही खासदार हे खोटे आहे असे ओरडत होते. एकूण सत्तेच्या मस्तीमुळे साधी माणुसकीही दाखवू शकत नाहीत अशा थराला भाजपवाले पोचले आहेत ही अत्यंत शरमेची बाब आहे. आता त्यांनी राहुल गांधी यांनी महिला खासदारांकडे पाहून अभद्र हावभाव केले असा आक्षेप घेतला आहे. राहुल यांनी असे काही केले असेल तर ते गैर आहे. मात्र भाजप ज्या रीतीने या सर्व विषयाला वळण लावू पाहत आहे ते सर्वाधिक अभद्र आहे.

मूळ मुद्दाच हरवला

संसद ही सर्वोच्च सभागृह आहे. सर्व देशाला लागू होतात असे कायदे तिथे संमत होतात. मात्र एखाद्या ग्रामपंचायतीपेक्षाही वाईट असे वर्तन तेथील खासदार आज करीत आहेत. त्यांच्या भाषणाची पातळी अत्यंत खालच्या दर्जाची आहे. मंगळवारी महाराष्ट्राचे काही खासदार बोलले. त्यात सुप्रिया सुळे यांचे मुद्देसूद व अभ्यासू भाषण झाले. नऊ वर्षात नऊ सरकार पाडण्यात आली हा त्यांचा भाजपवरचा वार अत्यंत अचूक होता. अन्य सदस्य मात्र महाराष्ट्राच्या राजकारणाची धुणी धुवायला जमल्याप्रमाणे तेथे वागत होते. एकनाथ शिंदे यांचे पुत्र श्रीकांत शिंदे यांनी तेथे हनुमान चालिसा म्हणून दाखवणे हा थिल्लरपणाचा कळस होता. नारायण राणे हे खरे तर लोकसभेचे सदस्य नाहीत. त्यांना लोकसभेत केवळ प्रश्नांना उत्तरे देण्यापुरतेच बोलायला दिले जायला हवे. मात्र ते शिवसेनेच्या सदस्यांना तुमची औकात काय वगैरे दमदाटी करीत होते व अध्यक्षही त्यांचे हे भाषण रोखताना दिसत नव्हते. हा अविश्वास प्रस्ताव आपण नेमका का आणला आहे याबाबत विरोधी सदस्यांमध्येही स्पष्टता दिसत नाही. मणिपूरच्या मुद्द्यावर पंतप्रधानांना बोलायला लावणे हा काही यातला मुख्य हेतू असू शकत नाही. भाजपने देशभर मुस्लिमद्वेषाचे वातावरण निर्माण केले आहे. त्यातूनच हरियाणासारख्या दंगली घडत आहेत. मणिपूरकडेही भाजप त्याच नजरेने पाहत आहे. कुकी हे अफूच्या व्यवहारात अडकलेले असून त्यावर बंदी आणली म्हणूनच आज हिंसाचार उफाळला आहे असे सांगण्याचा केविलवाणा प्रयत्न भाजपने चालवला आहे. साधा मुद्दा असा आहे की हिंसाचारात बळी पडलेल्यांमध्ये बहुसंख्य कुकी आहेत. महिलांची नग्न धिंड वा बलात्कार अशी असंख्य प्रकरणे होऊनही राज्यातील सरकार ती दडपण्याचाच प्रयत्न करीत होते. जे मणिपूरमध्ये चालू आहे तेच उत्तर प्रदेशात गौरक्षेच्या नावाखाली चालू आहे. तेथेही अशाच रीतीने प्रकरणे दाबण्याचा प्रयत्न होत आहे. विरोधकांनी या मुद्द्यावर भाजपची कोंडी करणे अपेक्षित होते. दुर्दैवाने त्यांनाही राजकारणाचा मोह आवरला नाही.

विचार

इम्रान खान यांच्या राजकारणाला ब्रेक

इस्लामाबादमधील कनिष्ठ न्यायालयाने तोशाखाना प्रकरणात माजी पंतप्रधान इम्रान खान यांना दोषी ठरवले आणि तीन वर्षे कारावासाची शिक्षा केली. न्या निकालानंतर पोलिसांनी त्यांना अटक केली. इम्रान यांची या वर्षातील ही दुसरी अटक आहे. शिक्षा झाल्यामुळे त्यांना निवडणूक लढवता येण्याची शक्यता नाही. अर्थात उच्च न्यायालयात अपील केले, तिथे शिक्षा कायम झाली तर त्यांच्या राजकारणाला ब्रेक लागण्याची शक्यता आहे.

प्रा. विजयकुमार पोटे

तोशाखाना प्रकरण ऑगस्ट २०२२ मध्ये प्रकाशझोतात आले, तेव्हा निवडणूक आयोगाने इम्रान यांच्यावर कारवाई केली आणि निवडणूक लढवण्यास अपात्र ठरवले. या प्रकरणात इम्रान यांची तिसरी पत्नी बुशरा बीबीच्या प्रवेशामुळे 'पीटीआय' पक्षाच्या प्रमुखांच्या अडचणी वाढल्या आहेत. डिसेंबर २०२२ मध्ये बुशरा बीबीचे दोन ऑडिओ संवाद लीक झाले होते. त्यानंतर न्यायालय आणि प्रशासनाने कारवाई आरंभली. यानंतर ट्रायल कोर्टाने सुनावणीला वेग दिला. डिसेंबरमध्ये लीक झालेल्या ऑडिओमध्ये बुशरा बीबी इम्रानला भेट दिलेली घड्याळे एका अधिकाऱ्याला विकण्यास सांगत होती. इम्रान खान आणि त्यांच्या कुटुंबियांनी चुकीच्या पद्धतीने भेट मिळालेल्या वस्तू विकल्याचेही न्यायालयाला आढळून आले आहे. 'जिओ टीव्ही'च्या वृत्तानुसार, इस्लामाबादच्या जिल्हा सत्र न्यायालयाने तोशाखाना प्रकरणात इम्रानला दोषी ठरवले आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश हुमायून दिलावर यांनी आपल्या निर्णयात म्हटले की पीटीआय अध्यक्षांविरुद्ध आरोप सिद्ध झाला आहे.

तोशाखाना प्रकरणात इम्रानवर पंतप्रधानपदाचा गैरवापर करून ५० कोटींहून अधिक किमतीच्या सरकारी भेटवस्तूंची चुकीच्या पद्धतीने विक्री केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात इम्रानसोबत त्याच्या पत्नीलाही आरोपी करण्यात आले आहे. कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला तात्काळ आव्हान दिले जाईल, असे इम्रान यांच्या वकिलाने म्हटले आहे. आम्ही कायदेशीर लढाई लढत राहू असे सांगत इम्रानच्या टीमने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. तोशाखाना प्रकरण सर्वप्रथम पाकिस्तानच्या सत्ताधारी पक्षाने पाकिस्तानी लोकशाही चळवळीने (पीडीएम) उचलून धरले होते. 'पीडीएम'ने निवडणूक आयोगाकडे केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की इम्रानने भेटवस्तू विकल्याप्रकरणी चुकीची माहिती दिली. यानंतर निवडणूक आयोगाने सविस्तर आदेशात म्हटले की भेटवस्तू विकल्याचा इम्रान यांच्याविरोधातील आरोप खरा आहे. त्यामुळे त्याला पाकिस्तानच्या लोकप्रतिनिधी कायदा ६३ (१) अंतर्गत अपात्र ठरवण्यात आले आहे.

इम्रान खान यांनी आयोगाचा निर्णय चुकीचा ठरवत कोर्टात धाव घेतली. इम्रान यांनी आपल्या युक्तिवादात तोशाखानाचा या प्रकरणाशी काहीही संबंध नसल्याचे सांगितले. डिसेंबर २०२२ मध्ये बुशरा बीबीच्या दोन ऑडिओ टेप व्हायरल झाल्या होत्या. एकात बुशरा बीबी झुल्फिकार बुखारी यांच्याशी बोलत होत्या तर दुसऱ्यामध्ये इनाम खान यांच्याशी. पाकिस्तानी मीडिया रिपोर्टस्नुसार, भेटवस्तू विकण्यात बुखारी आणि इनाम यांची प्रमुख भूमिका होती. बुखारी यांच्याशी झालेल्या संवादादरम्यान बुशरा इम्रानला भेट म्हणून मिळालेली घड्याळे विकण्यास सांगत होती. तिथे ती इम्रान खानला काहीतरी शिव्या देत होती. व्हायरल झाल्यानंतर बुखारी आणि इनाम यांच्या प्रतिक्रियाही आल्या. यानंतर गुन्हेगारी शाखेनेही बुशराला नोटीस दिली; मात्र बुशरा बीबी अद्याप तपास यंत्रणेसमोर चौकशीसाठी हजर झालेली नाही. इम्रानला शिक्षा झाल्यानंतर बुशरा बीबीवरही कारवाई होऊ शकते, असे मानले जात आहे.

इम्रान खान यांचे एकही घड्याळ विकले गेले नसल्याचे बुशराचे म्हणणे आहे. दुसरीकडे, दुसरा ऑडिओ १६ डिसेंबर रोजी लीक झाला होता. त्यामध्ये बुशरा इनाम खान यांच्यांशी बोलत आहे. या ऑडिओमध्ये बुशरा पुरस्काराबाबत नाराजी व्यक्त करत होती. या प्रकरणी न्यायालयात सुनावणी सुरू असताना इम्रान खान यांच्या वकिलांनी विचित्र युक्तिवाद करण्यास सुरुवात केली. इम्रान यांच्या वकिलांनी सांगितले की, ही भेट राष्ट्रीय सुरक्षेची बाब आहे. ही माहिती समोर ठेवली तर भेटवस्तू देणाऱ्या देशांशी संबंध बिघडू शकतात. इस्लामाबाद उच्च न्यायालयात इम्रानच्या वकिलांनी सांगितले की ज्या पद्धतीने प्रकरण खालच्या न्यायालयात सोपवण्यात आले ते चुकीचे आहे. न्यायमूर्ती दिलावर हे पक्षपाती न्यायाधीश असल्यामुळे हा खटला अन्य न्यायालयात वर्ग करण्यात यावा; मात्र न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळून लावली. पाकिस्तानमध्ये राष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्री किंवा कोणत्याही अधिकाऱ्याला परदेशातून मिळालेली भेट आली तर ती तोशाखान्यात ठेवली जाते. त्याची स्थापना १९७४ मध्ये झाली. तोशाखान्यात पैसे जमा केल्यानंतर संबंधित व्यक्ती आपली भेट परत घेऊ शकते. तोशाखाना नियमानुसार भेटवस्तू दहा हजार पाकिस्तानी रुपयांपर्यंत असल्यास संबंधित व्यक्ती कोणतेही पैसे न भरता ती वस्तू स्वत:कडे ठेवू शकते. मात्र त्यापेक्षा जास्त किंमतीच्या वस्तू तोशाखान्यात ठेवाव्या लागतात. त्याची विक्री करता येत नाही.

इम्रान खान सरकारमधील माहिती मंत्री मरियम औरंगजेब यांनी सांगितले की इम्रान यांना राजकीय सूडबुद्धीने लक्ष्य केले जात आहे. इस्लामाबादच्या जिल्हा आणि सत्र न्यायालयाने तोशाखाना प्रकरणात इम्रान खान यांना दोषी ठरवले असून एक लाख रुपयांच्या दंडासह तीन वर्षांची शिक्षा सुनावली आहे. इम्रान खान यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. ते २०१८ मध्ये पाकिस्तानच्या पंतप्रधानपदी निवडून आले होते; परंतु गेल्या वर्षी अविश्वास प्रस्तावात पराभूत झाल्याने त्यांना पदावरून पायउतार व्हावे लागले होते. एप्रिल २०२२ मध्ये पंतप्रधानपदावरून हटवण्यात आल्यापासून त्यांच्यावर शंभरहून अधिक गुन्हे दाखल झाले आहेत. इम्रान खान यांना यापूर्वीही एकदा अटक करण्याचा प्रयत्न झाला होता; मात्र त्या वेळी त्यांना पोलिसांच्या ताब्यातून दूर ठेवण्यासाठी त्यांचे समर्थक रस्त्यावर उतरले होते. या वर्षी मे महिन्यात इम्रान खानला न्यायालयाच्या आदेशानुसार हजर न राहिल्यामुळे अटक करण्यात आली होती; मात्र त्यांची अटक बेकायदेशीर असल्याचे सांगत नंतर सुटका करण्यात आली. तेव्हापासून त्यांच्या पक्षावर प्रशासनाचा दबाव खूप वाढला होता. पक्षाच्या अनेक ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी पक्ष सोडला. इम्रान खान यांच्या अटकेनंतर झालेल्या हिंसाचारात सहभागी झाल्यामुळे हजारो कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली.

पाकिस्तानला राज्यकर्त्यांच्या भ्रष्टाचाराचा, बेदिलीचा मोठा इतिहास आहे. पूर्व पाकिस्तानमधील बंगाली राजकारणी सुहरावर्दी हे देशाचे पाचवे पंतप्रधान होते. देशविरोधी कारवायांच्या आरोपाखाली त्यांना जानेवारी १९६२ मध्ये अटक करण्यात आली होती. जाणकारांचे म्हणणे आहे की सुहरावर्दी यांचा खरा गुन्हा म्हणजे लष्करी शासक जनरल अयुब खान यांना पाठिंबा देण्यास दिलेला नकार. पाकिस्तानचे नववे पंतप्रधान भुट्टो यांना १९७४ मध्ये एका राजकीय विरोधकाच्या हत्येचा कट रचल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. त्यांना चार एप्रिल १९७९ रोजी फाशी देण्यात आली. पाकिस्तानच्या एकमेव महिला पंतप्रधान बेनझीर भुट्टो यांनाही अनेकदा अटक करण्यात आली होती. त्या देशाच्या दोन वेळा पंतप्रधान राहिल्या. यानंतर, त्यांना ऑगस्ट १९८६ मध्ये लष्करी शासक जनरल झिया-उल-हक यांना कराचीतील रॅलीत धमकावल्याबद्दल अटक करण्यात आली. एप्रिल १९९९ मध्ये त्यांना भ्रष्टाचाराच्या प्रकरणात पाच वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली. पाच दशलक्ष पौंडांचा दंडही ठोठावण्यात आला; मात्र पाकिस्तानबाहेर रहात असल्याने त्या अटकेतून सुटण्यात यशस्वी झाल्या.

१९९९ मध्ये जनरल परवेझ मुशर्रफ यांनी पाकिस्तानची सूत्रे हाती घेतली तेव्हा नवाज शरीफ यांना अटक केली. यानंतर शरीफ दहा वर्षे राजकीय वनवासात राहिले. जुलै २०१८ मध्ये शरीफ आणि त्यांची मुलगी मरियम नवाज यांना भ्रष्टाचाराच्या प्रकरणात दहा वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली. त्याच वर्षी डिसेंबरमध्ये शरीफ यांना अल-अझिझिया स्टील मिल भ्रष्टाचार प्रकरणात सात वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली होती. २०१९ मध्ये ते उपचारासाठी लंडनला गेले होते. त्यानंतर ते परत आलेच नाही. शाहिद खाकान अब्बासी अब्बासी यांना जुलै २०१९ मध्ये अटक करण्यात आली होती. लिक्विफाइड नॅचरल गॅस भ्रष्टाचार प्रकरणात सहभागाचा आरोप त्यांच्यावर होता; मात्र नंतर अब्बासी यांना जामीन मिळाला. इम्रान खान यांना ९ मे २०२३ रोजी भ्रष्टाचाराच्या आणखी एका प्रकरणात अटक करण्यात आली होती; मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर काही दिवसांमध्येच त्यांची सुटका झाली. इम्रान यांनी निवडणूक आयोगाला सांगितले होते की त्यांच्यावरील आरोपांमध्ये मोठा मुद्दा ठरलेल्या भेटवस्तू त्यांनी राज्याच्या तिजोरीतून २.१५ कोटी रुपयांना विकत घेतल्या. वस्तुत: त्या विकून त्यांना सुमारे ५.८ कोटी रुपयांचा नफा झाला. या भेटवस्तूंमध्ये एक ग्राफ घड्याळ, कफलिंक्सची एक जोडी, एक महागडा पेन, एक अंगठी आणि चार रोलेक्स घड्याळांचा समावेश होता. आता शिक्षा झाल्याने त्यांच्या राजकारणावर अनिश्चिततेचे सावट आहे.

आजकाल

गणपतराव देशमुख- लोकनेत्याचे स्मरण

प्रा,लक्ष्मण हाके

ज्येष्ठ नेते,माजी मंत्री स्व.गणपतराव देशमुख यांची गुरुवारी (१० ऑगस्ट) जयंती.महाराष्ट्राच्या राजकीय,सामाजिक,सहकार,शैक्षणिक क्षेत्रात सात दशकांहून अधिककाळ कार्यरत राहिलेल्या आबासाहेबांची सर्वसामान्यांशी जुळलेली नाळ हे मोठे समीकरण होते.त्यांच्या जयंतीनिमित्त या लोकनेत्याच्या कार्याचा घेतलेला हा मागोवा.

१० ऑगस्ट १९२७ ला पेनूर या गावी जन्मलेल्या गणपतराव देशमुख यांनी माध्यमिक शिक्षण पंढरपूर येथे घेतले. पुण्याच्या एस पी कॉलेज मधून ते पदवीधर झाले. कायद्याची पदवी त्यांनी १९५६ मध्ये प्राप्त केली, विद्यार्थी दशेतच राजकारणाचे बाळकडू त्यांना मिळाले, पुण्यामध्ये विद्यार्थी आंदोलनात सहभाग घेतला. विद्यार्थी आंदोलनातून राजकारणाला सुरुवात... गोविंदराव बुरगुटे, एस एस पाटील, डॉ आप्पासाहेब पवार या मित्रांच्या सहाय्याने त्यांनी विद्यार्थ्यांच्या फी वाढ विरोधी आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांनी तुरुंगवास ही भोगला. वकिलीचे शिक्षण घेतलेला हा उमदा तरुण, सांगोला-पंढरपूर परिसरात वकिलीची प्रॅक्टिस करू लागला. घरची परिस्थिती उत्तम, देशमुखी रुतबा होता. आपले चुलते गौडवाडीचे यशवंतराव देशमुख यांच्या कोर्टाच्या खटल्यात त्यांना मदत करू लागले. १८९० च्या दुष्काळात बुद्धेहाळ तालुका सांगोला येथे इंग्रजांनी तलाव बांधण्यासाठी हाती घेतला होता. पण खूप दिवस काम रेंगाळले होते. अखेर १९५६ ला या तलावाचे काम पूर्ण झाले. या तलावात १५० घरे आणि १६०० एकर जमीन गेली होती. जमीन गेलेल्या लोकांचे पुनर्वसन होत नव्हते.. म्हणून गणपतराव देशमुख यांनी समिती च्या माध्यमातून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी लढा उभारला. चुलते यशवंतराव देशमुख, गौडवाडीचे ज्ञानोबा माळी, गडदे-पाटील, सरगर मंडळी नी भाई गणपतराव देशमुख यांना साथ दिली. त्यांच्या घरांना आणि जमिनीला योग्य मोबदला मिळवून दिला. इथूनच त्यांच्या राजकारणाचा श्री गणेशा झाला. याच दरम्यान सांगोला तालुक्यात शेकाप चळवळ चांगली रुजली होती. - रावसाहेब पतंगे, चव्हाण मास्तर, शंकरराव कुमठेकर, भाई ढोले, अब्दुल जमादार, पंढरीनाथ बाबर, दामू अण्णा शिंदे, तुकाराम पाटील, भानुदास बाबर, डॉ केळकर ई अनेक नेते होते. तो काळ स्वातंत्र्योत्तर होता. देशाला स्वातंत्र्य मिळण्याच्या अगोदर महाराष्ट्रात सामाजिक चळवळीमधून शेकापचा जन्म झाला होता. शेकापने अनेक चळवळी उभ्या केल्या. गोवामुक्ती चळवळ, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, महागाई विरुद्धची चळवळ, आणीबाणी विरुद्धची चळवळ, शेतकऱ्यांना किफायतशीर भाव मिळावा म्हणून चळवळ, अश्या अनेक चळवळी केल्या. १९४९ ला दाभाडी प्रबंध स्वीकारून शेकापने डाव्या विचारांचा पुरस्कार केला. १९६१साली सांगोला येथे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या अध्यक्षतेखाली वीर धरणाच्या पाण्यासाठी त्यांनी पाणी परिषद घेतली. १९७० साली नागज येथे वसंतराव दादा पाटील यांच्या उपस्थितीत पाणी परिषद घेतली. अश्या एक ना अनेक आंदोलनामध्ये ते अग्रक्रमाने कार्यरत राहिले. १९६२ मध्ये सांगोला विधानसभा निवडणुकीत आमदार म्हणून निवडून आलेल्या गणपतराव देशमुख यांनी तालुक्यावर आपल्या नेतृत्व आणि कर्तृत्वाने पकड मिळवली. १९७८ ते १९७९ या काळात ते पुलोद या शरद पवार यांच्या मंत्री मंडळात कृषीमंत्रीपदावर कार्यरत होते,१९९९ ते २००१ या काळात ते पणन आणि रोजगार मंत्री म्हणून कार्यरत राहिले. कापूस एकाधिकार योजना मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्याकडून जाहीर करून घेतली. शेतमजुराला किमान वेतन आणि रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून ते आग्रही राहिले. दुष्काळी भागातील तालुक्यांना अग्रक्रमाने पाणी मिळावे आणि समन्यायी पद्धतीने पाणी वाटप व्हावे. म्हणून काम करत राहिले. क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी, आर आर पाटील यांच्या साथीने दर वर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीला आटपाडी येथे पाणी परिषदा घेतल्या. टेम्भु म्हैशाळ योजनेसाठी सातत्याने पाठपुरावा केला. युती शासन काळात या योजना मार्गी लागल्या. १९७८ साली मंत्रिमंडळात असताना नीरा उजवा कालवा फाटा क्रमांक ४/५ मंजूर करून घेतला. सांगोला तालुक्याच्या पिण्याच्या पाण्यासाठी महत्वाकांक्षी शिरभावी पाणी पुरवठा योजना तत्कालीन पाणी पुरवठा मंत्री अण्णासाहेब डांगे यांच्या मदतीने पूर्ण केली. १९८० साली शेतकरी सहकारी सूतगिरणी सुरू केली. महिला सूतगिरणी ही सुरू केली. सांगोला तालुका शिक्षण प्रसारक शिक्षण मंडळ च्या माध्यमातून शैक्षणिक कार्य उभे केले. सांगोला विधानसभा मतदार संघातुन ते ११ वेळा आमदार म्हणून निवडून आले, एकच पक्ष-एकच व्यक्ती म्हणून त्यांचा नावलौकिक वाढला. महाराष्ट्राच्या विधानसभेत अनेक जनहिताचे कायदे झाले, विरोधी पक्षात राहूनही आपल्या अभ्यासू मार्गदर्शनाने त्यांनी महाराष्ट्राच्या विकासात भर घातली, विधानसभा अधिवेशनात त्यांनी सत्ताधारी पक्षाला नेहमी अनेक मुद्द्यावर सळो की पळो करून सोडले. केशवराव धोंडगे, दाजीबा देसाई, दत्ता पाटील, कृष्णराव धुळप, अण्णासाहेब गव्हाणे, प्रा एन डी पाटील यांनी विधानसभा गाजवून सोडली होती. विद्यापीठाची डी लीट सारखी पदवी असो अथवा महाराष्ट्र शासनाच्या जीवनगौरव पुरस्काराने ते तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते सन्मानित झाले आहेत. अनेक पुरस्कारांपेक्षा ते नेहमी जनतेच्या जिव्हाळ्याचा विषय राहिले आहेत, आपल्या चारित्र्याच्या आणि आचरणाच्या जोरावर ते महाराष्ट्राच्या राजकारणातील आदर्श ठरले आहेत, विधानसभेच्या कामकाजात जास्तीत जास्त वेळ उपस्थित राहून अभ्यास पूर्ण योगदान देणारा आणि जास्त वेळा निवडून येणारा लोक मनातला नेता म्हणून अख्खा महाराष्ट्र त्यांना ओळखतो.आबासाहेबांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

(साभार)

लोकसंसद

अमेरिकेत १५ ऑगस्ट

अमेरिकेत राष्ट्रीय पातळीवर १५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा होणार असल्याची बातमी वाचनात आली यासाठी संसदेत विधेयक दाखल करण्यात आले आहे अमेरिकेच्या हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हचे भारतीय वंशाच्या एका खासदारांनी हा प्रस्ताव दाखल केला आहे भारत जगातील दोन मोठ्या लोकशाही देशांपैकी असून त्यामुळे अमेरिकेसारख्या लोकशाही देशानेही भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करावा अशी मागणी ठाणेदार नामक खासदाराने केल्याने अनिवासी भारतीयांचा सन्मान होणारं असून आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची मान उंचावणार आहे भारत आणि अमेरिका दरम्यान मजबूत आंतरराष्ट्रीय सबंध असल्याने हे विधेयक मंजूर होण्याच्या अशा पल्लवीत झाल्या आहेत दोन्हीं देशांची मूल्य लोकशाहीवर आधारित आहेत भारत आणि अमेरिकाच्या द्विपक्षीय संबंधामुळे जगातील अन्य देशांत लोकशाहीची भावना, शांतता आणि स्थिरता निर्माण होण्यास मदत होणार असल्याने या प्रस्तावाला अमेरिकन खासदार बडी कार्टर आणि ब्रॅड शर्मन यांनी अनुमोदन दिले आहे अमेरिकेत राहणारे भारतीय अनेक मोठ्या पदावर कार्यरत आहेत यामध्ये विशेष करुन सरकारी,लष्करी अधिकारी, न्यायाधीश यांचा समावेश आहे हे सर्वजण अमेरिकेचा विकास आणि विचारधारा पुढे नेण्याचे कार्य करत आहेत त्यामुळे अमेरिकेत भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा केल्यास या सर्वांचा योग्य तो गौरव होवून दोन्हीं देशांतील आंतरराष्ट्रीय पातळीवर आणखीन संबंध दृढ होतील असे प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे त्यामुळे या विधेयकाला अमेरिकेच्या संसदेत कितपत पाठिंबा मिळतो ते पहाणे भारतीयांसाठी महत्वाचे ठरणारं आहे!

राजू जाधव, मांगूर

प्रेरणा

गणित

मी शाळेत होतो तेंव्हा आमचे एक गणिताचे शिक्षक होते. त्यांचे गणितावर प्रचंड प्रेम होते. गणिताशिवाय जगात काही तर्कशुद्ध नाही असे त्यांचे मत होते. त्यांना मी वर्गात बसलेला आवडतच नसे. त्यांचा क्लास असला की ते मला हमखास आधीच वर्गाबाहेर काढून टाकत असत. मी म्हणे विनाकारण त्रास देतो. काय त्रास, तर मी प्रश्न विचारत असे.

ते गणित घालत की समजा वीस मजुरांना एक इमारत बांधायला चार महिने लागत असतील तर चाळीस मजुरांना किती दिवस लागतील... मी त्यांना म्हणायचो की सर, तुमच्या प्रश्नाचे उत्तर देण्याआधी माझी एक शंका आहे त्याचे समाधान करा. तुम्ही गणित मांडले की वीस मजुरांना एक इमारत बांधायला चार महिने लागतील, तर चाळीस मजुरांना किती, याचा अर्थ तुम्हाला अपेक्षित उत्तर आहे की अर्धा वेळ लागेल.

म्हणजे दोन महिने लागतील. पण समजा आपण ऐंशी मजूर लावले तर ती इमारत एक महिन्यात बांधून होईल.. एकशे साठ मजूर लावले तर पंधरा दिवसात होईल. तीनशे वीस लावले तर सात दिवसात होईल.. या गणितात मांडलेल्या तर्काला धरून आपण एक लाख मजूर लावले तर ती इमारत एका मिनिटात बांधून होईल का?

बस, मी एवढा प्रश्न विचारला म्हणून माझ्यावर खूप भडकले ते आणि मला वर्गाबाहेर हाकलून लावले.. काही कळत नाही म्हणे तुला गणितातले..

ओशो प्रवचनातून

व्हायरल

कालिदास आणि सरस्वतीचा संवाद

कालिदास:- माते थोडं पाणी द्या,तुम्हाला पुण्य मिळेल..

स्त्री:- बाळा मी तुला ओळखत नाही,तू कोण आहेस ते सांग?

मी तुला पाणी देते..!

कालिदास:- मी वाटसरू आहे,कृपा करून मला पाणी द्या..!

स्त्री:- तू वाटसरू कसा असू शकतोस?

वाटसरू फक्त दोनच आहेत एक सूर्य आणि दुसरा चंद्र जे कधीही थांबत नाहीत.

यापैकी तू कोण आहेस ते खरं सांग..!!

कालिदास:- मी पाहुणा आहे,कृपा करून मला पाणी द्या.

स्त्री:- तू पाहुणा कसा असू शकतोस?

या संसारात फक्त दोनच पाहुणे आहेत,एक पैसा,आणि दुसरं तारुण्य..!!

या दोन गोष्टी जायला वेळ लागत नाही,त्यामुळं तू खरं सांग तू कोण आहेस?

कालिदास:- मी सहनशील आहे आतातरी पाणी द्या..!

स्त्री:- नाही.. सहनशील तर दोनच आहेत,

एक जमीन जी पापी पुण्यवान लोकांचे ओझे वाहतेय,

जमिनीत बी पेरले तर कोठारे भरतील एवढी धान्य देतीय,

दुसरं झाड आहे त्यांना कितीही दगड मारले तर गोड फळ देतेय..!

त्यामुळं तू सहनशील नाहीस, खरं सांग तू कोण आहेस?

(कालिदास जवळपास चक्कर येण्याच्या स्थितीत होते आणि थोड रागाने बोलले)

कालिदास:- मी जिद्दी आहे.

स्त्री:- पुन्हा खोटं..जिद्दी तर दोनच..

एक नख दुसरं केस..!! कितीही वेळा कापा परत येतातच..खरं सांग तू कोण आहेस?

(पूर्ण अपमानित आणि पराभूत स्थितीत)

कालिदास:- खरंतर मी मूर्खच आहे..!!

स्त्री:- नाही तू मूर्ख कसा असू शकतोस? मूर्ख तर दोनच आहेत.. पहिला चौथीत नापास झालेला राजा जो योग्यता नसताना लोकांच्यावर राज्य करत आहे,

आणि दुसरे त्याचे भाट जे राजाला प्रसन्न करण्यासाठी चुकीचा निर्णय कसा बरोबर आहे हे सांगत असतात.

(आता मात्र काहीही न बोलण्याच्या स्थितीत कालिदास त्या स्त्रीचे पाय धरतात आणि पाण्यासाठी याचना करतात) स्त्री:- उठ वत्सा....

(आवाज ऐकून कालिदास वर पाहतात तर साक्षात सरस्वती देवीला बघून कालिदास पुन्हा पाय धरतात)

सरस्वती देवी:- दोन वेळा चूक केली आहेस आता २०२४ ला परत चुकी करू नकोस..!!

बाबूराव महाजन

निवडक

तळोजा येथे गुटखा जप्त

पनवेल : तळोजा येथील घरावर छापा टाकून गुन्हे शाखा पोलिसांनी दोन लाखांचा गुटखा जप्त करून तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. पडघा येथील एका घरात गुटख्याचा साठा असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यावरून वरिष्ठ निरीक्षक पराग सोनवणे यांच्या पथकाने त्याठिकाणी एका घरावर छापा टाकला. यामध्ये गुड्डू गुप्ता (२८) याने त्याच्या राहत्या घरात तिथे साठवलेला एक लाख ९७ हजार रुपये किमतीचा गुटखा आढळून आला.

शैक्षणिक साहित्य वाटप

बोर्लीपंचतन : आशिर्वाद फाउंडेशनतर्फे श्रीवर्धन तालुक्यातील राजिप शाळा कापोली, बोर्ली, शिस्ते, कार्ले आदिवासीवाडी, शिस्ते अंगणवाडी, दिवेआगर येथील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमप्रसंगी निखिल रीळकर, अनिकेत खोत, मयूर कविलकर, निशांत रिळकर, परेश मोहिते, कुणाल माळवदे, कपिल सूर्यवंशी, अमित सावंत, राहुल चव्हाण, नितेश मोरे, राकेश तोडणकर,उपस्थित होते.

शहिदांना श्रध्दांजली

खारेपाट : बॅ. अंतुले काँग्रेस भुवन अलिबाग येथे ८ ऑगस्ट क्रांती दिन साजरा करण्यात आला. यावेळी शहिदांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी भास्कर चव्हाण, राजाभाऊ ठाकूर, ॲड. श्रध्दा ठाकूर, प्रभाकर राणे, सरोज डाकी, जगदीश कवळे, विजय पाटील, जगन्नाथ पाटील, प्रा. राकेश पाटील, नमिता म्हात्रे, जगन्नाथ पेढवी, ॲड शैलेश मोकल, रमांकांत म्हात्रे, निशिकांत मोकल, बाळाराम म्हात्रे, श्रीकांत नाईक, नंदकुमार पाटील, सतिश म्हात्रे, कमलाकर गावंड आदि उपस्थित होते.

फुलझाडांची लागवड

उरण : कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोण एस एस सी बॅच १९९९ ,२००० तर्फे कोमणादेवी ऑक्सिजन पार्क सारडे येथे वृक्षारोपण संप्पन झाला सारडे गावाचे सरपंच रोशन पाटील, निलेश पाटील यांच्या सहकार्याने गुलाब मोगरा ,जाई, जुई, कृष्ण कमल, जास्वंद, चाफा, लिली आशा विविध प्रकारच्या फुलझाड लागवड ऑक्सिजन पार्कमध्ये करण्यात आली. यावेळी रोशन पाटील, निलेश पाटील, अजय म्हात्रे आदि सहकारी उपस्थित होते.

राष्ट्रभाषा परीक्षेस प्रतिसाद

आगरदांडा : शालेय विद्यार्थ्यांचे हिंदी भाषेवर प्रर्भुत्व मिळवण्यासाठी व भाषेची आवड निर्माण होण्यासाठी शिक्षण विभागाकडून या भाषेची परीक्षा घेतली जाते. या परीक्षेत सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना इयत्ता दहावीच्या परीक्षेत गुण वाढ मिळण्यास मदत होते. यासाठी श्रीछत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव या विद्यालात अखिल भारतीय हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा ही परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत २०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१० ऑगस्ट

१) ॲड. राजन प्रभाकर पाटील, अलिबाग (मोबा. ७५०७७४७८९८)
२) श्री. लक्ष्मण नीळकंठ नातू १०-८-१९२५, अलिबाग
३) श्री. रमाकांत रघुनाथ वाबळे १०-८-१९४२, अलिबाग
४) श्रीम. वंदना विश्वनाथ म्हात्रे १०-८-१९४२, सारळ-अलिबाग
५) श्री. गणपत सदाशिव नाटेकर १०-८-१९२९, गोंधळपाडा-अलिबाग
६) श्री. विजय शंकर घारपुरे १०-८-१९३९, अलिबाग
७) श्रीम. प्रतिभा परशुराम सुतार १०-८-१९५१, अलिबाग
८) श्रीम. वैशाली प्रभाकर इंदुलकर १०-८-१९५०, अलिबाग
९) श्री. गजानन अंदाजी पाटील १०-८-१९५२, अलिबाग
१०) श्री. काशिनाथ मधुसुदन क्रमवंत १०-८-१९५५, अलिबाग

पंचांग

१० ऑगस्ट २०२३
गुरुवार
विक्रम संवत्- २०७९
श्रावणशके संवत्- १९४५
संवत्सर - शोभननाम
अयन- दक्षिणायन
मास- श्रावण
ऋतु- वर्षा, कृष्ण पक्ष
तिथि : दशमी २९:०६:४३+
नक्षत्र : रोहिणी २८:०१:०६+
योग : ध्रुव १५:१०:०१
करण : वणिज १६:३४:५९
करण : विष्टि २९:०६:४३+
सूर्य : कर्क, चन्द्र : वृषभ
हिजरी सन् - १४४५, मुस्लिम मास - मोहरम
तारीख - २२

सुडोकू

6		3	8			5	9	
4				6		7		
9			4		1		6	3
7	4	1					8	
2								9
	6					4	5	2
3	2		5		7			1
		4		3				7
	7	6			4	9		5

मंगळवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर

5	2	3	7	4	1	8	9	6
8	1	6	5	2	9	7	3	4
7	4	9	6	8	3	5	2	1
4	5	1	9	6	7	2	8	3
6	7	2	8	3	4	1	5	9
9	3	8	2	1	5	4	6	7
3	6	5	4	7	8	9	1	2
2	9	7	1	5	6	3	4	8
1	8	4	3	9	2	6	7	5

PRESS SERVICES OF INDIA

माझी माती, माझा देश अंतर्गत वृक्ष लागवड

। पेण । प्रतिनिधी ।

माझी माती, माझा देश या उपक्रमाला बुधवार ९ ऑगस्ट क्रांतीदिनी सुरूवात झाली असून, पेण नगरपालिकेमध्ये सकाळी १० वाजता शपथ घेऊन पेण विष्णू नगर येथील आयुर्वेदिक उद्यानामध्ये आरोग्य निरिक्षक अंकिता इसाळ, बांधकाम अभियंता विनायक बनसोडे, आरोग्य निरिक्षक शिवाजी चव्हाण, माजी नगरसेवक संतोष पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी आरोग्य निरिक्षक अंकिता इसाळ यांनी स्मशान भूमी शेजारी जे आयुर्वेदिक गार्डन हे काही वर्षापूर्वी विकसीत केले होते त्यामधील बऱ्याच प्रकारची झाडे ही जगू शकली नाहीत. ती या अभियाना अंतर्गत वृक्षवाटीका तयार करणार असल्याचे सांगितले. तसेच नगरपालिकेचा हाच प्रयत्न राहणार असेल्याचे सांगितले.

मुद्रांक विक्रेत्यांना सहाय्यकाची गरज

सर्वसामान्यांची ओरड; दुय्यम निबंधकांचा कानाडोळा

। पेण । प्रतिनिधी ।

महसूल विभागाकडून सर्वसामान्य जनतेची गैरसोय होऊ नये म्हणून सुशिक्षित बेरोजगारांना मुद्रांक विकण्याचा परवाना देतो. पेणमध्ये तहसील कार्यालयाच्या आवारात एकूण सहा मुद्रांक विक्रेते आहेत. यामध्ये हबीब इब्राहिम खोत, प्रमोद हरी म्हात्रे, समीर प्रफुल्ल घोडींदे, राजेश नारायण पाटील, दिनेश मधुकर पाटील आणि प्रभाकर महादेव डंगर यांचा समावेश आहे. शासन ज्या वेळेला मुद्रांक विक्रेते म्हणून परवाना देते, त्यावेळेला या मंडळीला उदरनिर्वाहाचे साधन म्हणून मुद्रांक विक्री करायची असते. परंतु, आजच्या घडीला या मुद्रांक विक्रेत्यांनी असा काही फंडा अवलंबलेला आहे की, यामध्ये काहींना तीन-तीन, चार-चार सहाय्यक आहेत, आणि असे सहाय्यक ठेवणे नियमानुार चुकीचे आहे. या बाबीकडे दुय्यम निबंधक कानाडोळा करत आहेत.

मुद्रांक विक्रेत्यांपेक्षा त्यांच्या सहाय्यकांकडूनच सर्वसामान्य जनतेला अरेरावीचे उत्तरे दिली जातात. त्यामुळे सर्वसामान्य त्रस्त झाली आहे. आज सर्वसामान्य जनता कोणतेही काम घेउन तहसिल आवारातील मुद्रांक विक्रेत्यांकडे गेल्यास पहिल्यांदा या मुद्रांक विक्रेत्यांच्या सहाय्यकांकडून समोरच्या व्यक्तीची वेगळ्याप्रकारे कानउघाडणी केली जाते व अपमानास्पद वागणूक दिली जाते. नंतरच कामाचा विचार केला जातो. सर्वसामान्य जनता ही ग्रामणी भागातून आल्यामुळे त्यांचा नाईलाज

असतो. त्यामुळे भले बडबडा पण आमचे काम करा, अशी स्थिती असते. आज प्रत्येक मुद्रांक विक्रेत्याला एक टेबल लावण्याची परमिशन असताना मुद्रांक विक्रेत्यांचे टेबल पाहिल्यावर एक गोष्ट प्रकर्षनाने जाणवते ती म्हणजे दुय्यम निबंधक यांची मुद्रांक विक्रेत्यांवर मेहरनजर

खुलेआम दादागिरी

आमचे प्रतिनिधी मुद्रांक विक्रेत्यांच्या टेबलचे छायाचित्र काढण्यास गेले असता, मुद्रांक विक्रेत्यांच्या सहाय्यकांनी आमच्याच प्रतिनिधींचे फोटो काढून भीती दाखवण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारची खुलेआम दादागिरीच जणू काही या मुद्रांक विक्रेत्यांच्या सहाय्यकांची सुरू आहे.

राजेश जाधव यांचे निधन

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील उकरुळ गावचे रहिवासी असलेले राजेश काळूराम जाधव यांचे वयाच्या ४८व्या वर्षी निधन झाले. महाराष्ट्र राज्य शिक्षक समितीचे जिल्हा अध्यक्ष म्हणून जबाबदारी ते पार पाडत होते. जिल्हा परिषदेचे प्राथमिक शाळेचे शिक्षक म्हणून सेवा सुरू करणारे जाधव हे सध्या उमरोली येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून सेवा बजावत होते. शिक्षकांच्या पेण येथील सहकारी सोसायटीचे संचालक म्हणून ते लागोपाठ दुसऱ्यांदा निवडून आले आहेत. तर शिक्षक समिती या राज्यस्तरीय संघटनेचे जिल्हा अध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडत होते. त्यांचे पार्थिव त्यांच्या मुळगावी रात्रीच उकरुळ येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

भाजपमध्येच राहणार

पालरेचा यांचा खुलासा

। सुधागड-पाली । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यातील राष्ट्रवादीतून भाजपमध्ये प्रवेश केलेल्या गीता पालरेचा ह्या भाजपमध्ये होत असलेल्या घुसमटीमुळे पुन्हा राष्ट्रवादीत येणार असल्याची चर्चा मागील काही दिवसांपासून वृत्त माध्यमातून व जनमानसात सुरू होती. ही चर्चा जोरात रंगली असतानाच गीता पालरेचा यांनी दि. ८ ऑगस्ट रोजी पाली येथील त्यांच्या निवासस्थानी पत्रकार परिषद घेत या चर्चेला पूर्णविराम दिला असून, आम्ही भारतीय जनता पार्टीतच राहणार असल्याचे सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या की, भाजप हा फार मोठा पक्ष आहे. लोकहितासाठी मी व माझे कार्यकर्ते यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. मात्र, स्थानिक पुढाऱ्यांच्या होत असलेल्या राजकारणाचा सामान्य कार्यकर्त्यांना त्रास होत आहे. पक्षाच्या नियोजित कार्यक्रमात कार्यकर्त्यांना निमंत्रण देणे टाळणे, निधी वाटपात कार्यकर्त्यांना विश्वासात न घेणे, अशा विविध प्रकारच्या कुरघोडी स्थानिक पुढारी करत आहेत. अशा तक्रारी कार्यकर्त्यांनी माझ्याकडे केलेल्या आहेत. या तक्रारीबाबत वरिष्ठांशी चर्चा करणार आहे. कार्यकर्ते नाराज आहेत, मात्र कोणी कुठेही प्रवेश करणार नाहीत. आम्ही भाजपमध्येच राहणार असल्याचे गीता पालरेचा यांनी यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले.

नाईक अंतुले महाविद्यालयाचे यश

। म्हसळा । वार्ताहर ।

कोकण उन्नती मित्र मंडळाचे वसंतराव नाईक कला, वाणिज्य आणि बॅरिस्टर ए.आर.अंतुले विज्ञान महाविद्यालयाने तळा येथील द.ग.तटकरे महाविद्यालय मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या रायगड दक्षिण विभागाचा छपन्नव्वा युवा महोत्सवात यश संपादन केले आहे. मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत सर्व महाविद्यालयातील हजारो विद्यार्थ्यांना या स्पर्धेत भाग घेतला होता. वसंतराव नाईक महाविद्यालयातील नऊ विद्यार्थ्यांनी विविध कला प्रकारात भाग घेत घवघवीत यश संपादन केले.

आफिया फकी- स्टोरी टेलिंग बी ग्रुप, सना खान- वक्तृत्व बी ग्रुप, आर्यन येलवे- वक्तृत्व ए ग्रुप, सारा काठेवाडी व सादिया करबेलकर- वादविवाद ग्रुप बी, अमृता तोडणकर- रांगोळी, आयेशा उंड्रे- कोलाज, ईशरा उंड्रे - पोस्टर मेकिंग, मारूफा पठाण- मेंहदी या विविध स्पर्धेत सहभागी होत यश संपादन केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार मुश्ताक अंतुले, विश्वस्त सचिव

अशोक तळवटकर, वंदना विचारे, सचिव प्रतिनिधी फजल हळदे, विकास समितीचे सदस्य महादेव पाटील, निलम वेटकोळी, प्र.प्राचार्य डी.ए. टेकळे, युवा महोत्सवाचे समन्वयक प्रा. आर.एस. माशाळे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि हितचिंतक यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मनोहर पुरी सेवानिवृत्त

। माणगाव । वार्ताहर ।

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक मनोहर लक्ष्मण पुरी हे नियत वयोमानानुसार ३१ जुलै रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांचा सेवापूर्ती, निरोप समारंभ शनिवार ५ ऑगस्ट रोजी संस्थेचे कार्यकारणी सदस्य व शाळेचे शाळा समिती अध्यक्ष संजय पालकर, मुख्याध्यापक महादेव जाधव, सतीश पवार व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सलग

वावंजे येथून गुटखा हस्तगत

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल तालुका पोलिसांनी वावंजे गावात छापा टाकून गुटखा विक्री करणाऱ्यांविरोधात कारवाई करत हजारो रुपये किमतीचा गुटख्याचा साठा हस्तगत केला आहे. याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पनवेल वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जगदीश शेळकर, सहा. पोलीस निरीक्षक संजय गळवे आदींचे पथकाला गुप्त बातमीदाराकडून वावंजे गावात बेकायदेशीरपणे गुटख्याची विक्री होत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार या पथकाने वावंजे गावातील जुने फर्निचर मार्केट येथे छापा टाकून आरोपी अब्दुल हमीद जानमोहम्मद शेख, महेंद्र महातो आणि जितेंद्रकुमार कामत यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून १६ हजार २४७ रुपये किमतीचा गुटखा जप्त केला आहे.

हिरवळ महाविद्यालयाचे यश

। माणगाव । वार्ताहर ।

मुंबई विद्यापीठाअंतर्गत घेण्यात आलेल्या ५६ व्या युवा महोत्सवाचे आयोजन डी.जी.तटकरे महाविद्यालय, तळा इंदापूर येथे करण्यात आले होते. सदर युवा महोत्सवामध्ये हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी व हिरवळ रात्र महाविद्यालय यांनी ऑन द स्पॉट पेंटिंग, मेहंदी, सोलो वेस्टन गायन व सोलो भारतीय शास्त्रीय गायन ,वाद - विवाद स्पर्धा, कार्टूनिंग, वक्तृत्व स्पर्धा व रांगोळी स्पर्धेत सहभाग घेतला होता.

सदर स्पर्धेत महाविद्यालयातील कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी मधील तैहरीन दुस्ते हिला वेस्टन सोलो गायन प्रकारामध्ये द्वितीय क्रमांक, मेहविश अंतुले मेहंदी स्पर्धेमध्ये द्वितीय, निदा खेडकर व वसील कालसेकर वादविवाद द्वितीय क्रमांक पटकावला तसेच हिरवळ रात्र महाविद्यालयातील शाहिद गजगे व श्रुती पुरोहित वाद- विवाद तृतीय क्रमांक मिळवून महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली आहे. सदर विद्यार्थ्यांच्या यशामागे महाविद्यालयाचे प्रा. मनिषा बर्गे व प्रा. कपिल जोशी यांचे मोलाचे परिश्रम आहेत. हिरवळ संस्थेचे अध्यक्ष किशोर धारिया यांनी युवा महोत्सवाचे आयोजक महाविद्यालय, विद्यार्थी विकास कक्ष मुंबई विद्यापीठाचे संचालक डॉ. सुनिल पाटील, प्रा. निलेश सावे प्रा. जयेश म्हात्रे यांचे आभार मानुन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. हिरवळ संस्थेच्या संचालिका सोनाली धारिया, संस्थेच्या प्रमुख सल्लागार डॉ.संध्या कुलकर्णी, प्राचार्य सुदेश कदम, प्रा. राकेश वडवळकर यांनी सदर स्पर्धेत विद्यार्थी यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन केले तसेच सर्व यशस्वी व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील होणाऱ्या अंतिम फेरीसाठी शुभेच्छा दिल्या.

प्राथमिक आरोग्य केंद्र उपचारासाठी सक्षम

माणगावात औषधाबरोबरच डॉक्टरही सज्ज

। माणगाव । वार्ताहर ।

पावसाने विश्रांती घेतली आहे. त्यामुळे विविध साथीचे आजार वाढण्याचे धोके संभवतात. तसेच पावसामुळे नद्या, नाले वाहत आहेत. अनेक गावांना विहीर व नदीतील पाण्याचा पिण्यासाठी वापर केला जातो. ते पाणी नागरिकांनी गाळून व उकळून प्यावे असे आव्हान सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केले असून पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या रोगावर कर्मचारी लक्ष ठेऊन आहेत. माणगाव तालुक्यातील सहा प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश आहे. तर उपजिल्हा रुग्णालय स्वतंत्र आहे. त्यामुळे नागरिकांना आपल्या उपचारासाठी याचा मोठा फायदा होतो. तालुक्यातील सहा आरोग्य केंद्रात पुरेशा औषधाबरोबरच वैद्यकीय अधिकारी वर्गही पुरेसा आहे. त्यामुळे नागरिकांना सहज उपचार मिळत आहेत.

वेळोवेळी वैयक्तिक व परिसर स्वच्छता

करणे, उघड्यावर शौच, मलमुत्र विसर्जित न करणे जेणे करून पावसाळी हंगामात साथ रोग उद्भवू नये याकरिता खबरदारीचा उपाय म्हणून दक्षता बाळगण्याचे आवाहन केले आहे. उपजिल्हा रुग्णालयात पुरेसे वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी वर्ग व पुरेसा औषधासाठी तसेच रुग्ण वाहिकेच्या उत्तम, वातानुकूलित रुग्णवाहिका उपलब्ध आहे. तसेच पुरेसा ऑक्सिजन साठा व औषधे उपलब्ध आहेत. शासनाच्या वेळोवेळी येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून रुग्णांना जास्तीत जास्त सेवा पुरवून आपले कर्तव्य बजावत आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रात इंदापूर ४५ गावे २६०४८ लोकसंख्या आहे. नांदवी १४ गावे ७१४० लोकसंख्या आहे. शिरवली ३८ गावे १८७९२ लोकसंख्या आहे. गोरेगाव २५ गावे २८९३६ लोकसंख्या आहे. साई ४७ गावे ३४१५८ लोकसंख्या आहे. निजामपूर ४२ गावे ४५३०० लोकसंख्या आहे. तालुक्यातील एकूण १६०३७४ लोकसंख्येतील नागरिकांना या आरोग्य केंद्राचा प्राथमिक उपचारासाठी उपयोग होतो.

शब्दकोडे क्र.२०४



आडवे शब्द : १. सुरुवात, परिचय, ३. एकरूपता, ६. तुसडा, ९. रासायनिक असल्यास जमिनीचा कस कमी करणारे, १०. देवदासची प्रेयसी, ११. पडणे, १३. मार्ग, १४. थोडक्यात साष्टांग नमस्कार विनंती विशेष, १७. श्रीराम आणि पांडवांच्या वाट्याला आलेला समान भोग, १९. जोंधळ्याचा दाणा, २२. ऐटबाज, २३. आरोळी, २४. हत्ती, २५. शिंपल्यातील प्राणी, २६. नेहमी, २७. नामशेष, उद्ध्वस्त, २९. डाळिंब्या, ३०. किरकोळ सामान, ३३. फणसाचा एक प्रकार, ३५. धैर्य, ३७. कबूतर, ३८. व्यायाम, ४०. संधी, ४१. सुंदर तरुणी, ४२. शिर्डीचे संत, ४५. भूपती, ४६. गरा असलेले फळ, ४७. मजल, ४८. बभ्रा, ५०. किंमत, ५२. सापाची एक विषारी जात, ५४. नवरा (ग्रा.), ५५. प्रेमिकांना घायाळ करणारा नेत्रकटाक्ष, ५८. आईवडील, ६१. चिखल, ६२. धमनी, ६३. जाडसर पीठ, ६५. पंख, ६६. चलनवलन, ६९. अविरत साधना, ७१. ब्राह्मण, ७२. नऊ भावना, ७४. सपाट, ७६. रमापती, ७८. घर ८०. रसाळ, ८१. सर्वस्व, ८२. उदर, ८३. पाठवणी.

उभे शब्द : १. पहाटवेळेचा प्रकाश, तेजस्वी आभा (हिंदी), २. सांभाळ, जपणूक, ३. तलाव,४. पहारेकरी, ५. ज्वर, ६. मनुष्य, ७. प्रश्नोत्तरे, ८. आकार, मोठा बेत, १२. सिद्धता, १५. भव्य, अवाढव्य, १६. विनंती, १८. मनाला टोचणारे दुःख, २०. शहाणा, सुंदर, २१. संकट,पीडा, २५. वेळ घालवणे, २६. षष्ठीची देवता, २८. दार, २९. पातळ खांब, ३०. आवेशाने पुढे जाणे, ३१. रोखलेली नजर, ३२. आवड, ३४. गेरु, ३६. सर्वांना सारखे (वाटप), ३९. मनोहर, रमणीय, ४३. बगिचा, ४४. चोख, उत्तम सोने, ४५. सज्जनगडचे संत, ४६. हुकूम, ४७. बिनविषारी मोठा सर्प, ४९. तुमचा चांगला छंद!, ५१. कलावंत, ५३. धोबी, ५३. जुळे, ५७. ढग (हिंदी), ५९. अटीची भाषा, ६०. पाणी, ६१. प्रधानमंत्री, ६४. उत्तराधिकारी, ६५. ठेवलेली नजर, दबा, ६६. अधाशी, लालची, ६७. एक पालेभाजी, ६८. द्रव्य, ७०. पसरलेले, उथळ, ७३. व्रत, ७५. गजऱ्यातील सुगंधी पाने, ७७. क्रिकेटमधील धाव, ७९. पुष्परस,

शब्दकोडे क्र.२०३ चे उत्तर

आडवे उत्तर : १.रहाटगाडगे ५.हद्दपार ७.अवसान ९.मटका १०.अवस ११.सत्याग्रह १२.वास १४.स्थानबद्ध १६.यथार्थ १८.राग १९.रखरखीत २२.दास २३.अमर २४.रबर २५.जबाबदारी २७.सटरफटर ३०.वजन ३१.सहदेव ३३.टप ३५.पायजमा ३६.वरवर ३८.कटकट ३९.पालव ४१.दार ४२.आळ ४३.सव ४४.आदानप्रदान ४८.आरा ४९.वाचाळ ५०.कलेवर ५२.धाम ५३.समसमान ५५.सारक ५६.वर्तन ५७.दर ५८.नवागत ६०.मोठा ६१.खरवस ६२.कामकाज ६४.सरस ६६.कलह ६७.रग ६८.दाभण ६९.खनन ७१.रावा ७३.रसद ७४.कसर ७५.अंगतपंगत

उभे उत्तर : १.रमणीय २.हाट ३.टका ४.गेहत्याग ५.हरहर महादेव ६.पारावार ७.अवस्था ८.वसन ११.सरासरी १३.सखी १५.बोरबर १७.थापेबाज २०.खर २१.तत्पर २२.दादा २४.खटपट २५.जवळपास २६.बनपाव २८.टक्कर २९.फटकळ ३१.समाधान ३२.वरदान ३४.अटकळ ३७.वर ४०.लवकर ४२.आरास ४४.आव ४५.दारवठा ४६.प्रधान ४७.दाम ४८.आमरस ४९.वानवा ५१.लेक ५३.सदवर्तन ५४.मानद ५५.सावकार ५९.ताहहयात ६०.मोजदाद ६१.खसखस ६३.मगर ६४.सण ६५.पराग ७०.नर ७२.वात

नि व ड क

विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप

रसायनी : माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त माजी आ. मनोहर भोईर यांच्या वतीने शिवनगरवाडी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना बुधवार दि.९ ऑगस्ट रोजी खाऊचे वाटप करण्यात आले.यावेळी रजनी गायकवाड, रमेश पाटील, सुरेश म्हात्रे, सद्रुणा पाटील,स्वप्निल राऊत, संतोष पांगत, राकेश खराडे, योगेश खाने, शंकर भोईर, राजेश कदम, पंढरीनाथ कुरंगळे , मंदार वेदक आदीसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शैक्षणिक साहित्याचे वाटप

पनवेल : लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम तर्फे वारदोली जिल्हा परिषदेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.शालेय साहित्य मिळाल्यामुळे सर्व विद्यार्थी खूप आनंदित झाले होते. हे सर्व साहित्य ला. विजय गणात्रा यांचे तर्फे देण्यात आले. याप्रसंगी ए के शर्मा, विजय गणात्रा, संजय गोडसे, सुयोग पेंडसे तसेच सरगम क्लबच्या स्वाती गोडसे, मानदा पंडित, चेतन मिसाळ आणि शाळेतील शिक्षक वर्ग उपस्थित होते.

व्याख्यानमालेचे आयोजन

पनवेल : अधिक श्रावणमासानिमित्त श्री कपिकूल सिध्दपिठम्, पनवेल केंद्रातर्फे तथास्तू हॉल,पनवेल येथे १००८ श्रीमहंत तपोमुर्ती सद्गुरू वेणाभारती यांच्या अमृतवाणीतून भाविकांसाठी नवविधा भक्तीतून जीवन सार्थकता या प्रवचनमाले अंतर्गत ग्रंथराज श्रीमद् दासबोध ग्रंथावरील अभ्यासपूर्ण व्याख्यानमाला ११ ते १४ ऑगस्ट दरम्यान रोज संध्याकाळी ६:३० ते ८:३० या वेळात तथास्तू हॉल, पनवेल येथे आयोजित करण्यात आली आहे.

शाळेत रोपांचे वाटप

पनवेल : पार्श्व वुमेन्स फाऊंडेशनने पनवेल इंडस्ट्रियल टाऊनच्या रोटरी क्लब, संजय जैन मित्र मंडळाच्या सहकार्याने बार्न्स शाळेत रोपांचे वाटप करण्यात आले. यावेळी बसंती जैन, शीतल ठक्कर, भूमिका परमार, नेहा गांधी, मनाली परमार, रीना परमार, निशा जैन, कल्पना जैन, पायल कोठारी, प्रिती मुनोथ, आकांशा बंठिया, डॉ. जय भांडारकर, संजय जैन, संजय कदम आदी उपस्थित होते. शुभा भगत यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

निषेध मोर्चाचे आयोजन

नेरळ : मणिपूर येथे आदिवासी समाजाच्या महिलांवर अत्याचार करत तेथील आदिवासी बांधवांवर अन्याय करण्यात आला. या पार्श्वभूमीवर कर्जत येथे बुधवार ९ ऑगस्ट रोजी निषेध मोर्चा काढण्यात आला. तसेच प्रशासनाला आदिवासी संघटनेच्या शिष्टमंडळाकडून निवेदन देखील देण्यात आले. यावेळी प्रसाद थोरवे, ऋषिकेश राणे, परशुराम दरवडा, जयवंती हिंदोळा, दत्तात्रेय हिंदोळा, गणेश पारधी आदि उपस्थित होते.

शाळेच्या इमारती संरक्षक भिंतीविना

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषद शाळेच्या ७८७ इमारती संरक्षक भिंतीविना आहेत. तसेच १८९ शाळांच्या संरक्षक भिंती पक्क्या असूनदेखील त्या तुटलेल्या अवस्थेत असल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांसह शाळेतील मालमत्तेची सुरक्षा वाऱ्यावर आली असून शाळेचा परिसर भिंतीविना गुरांसाठी कुरणच बनले असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

विद्यार्थ्यांसह शाळेतील मालमत्तेची सुरक्षा वाऱ्यावर

शिक्षकांचा हक्क कायद्यानुसार शाळेची पक्की इमारत, शिक्षक, मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र खोली, क्रिडांगण, तसेच संरक्षक भिंत आदी भौतिक सुविधा असणे बंधनकारक आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून शाळा उभारणीपासून त्याठिकाणी लागणाऱ्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कोट्यावधी रुपयांचा खर्च केला जातो. परंतु जिल्हा परिषदेच्या शाळा आजही सुविधांपासून वंचित असल्याचे उघड झाले आहे.

जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या पहिली ते आठवीच्या सुमारे दोन हजार ५६६ शाळा असून नव्वद हजारापेक्षा अधिक विद्यार्थी या शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. या शाळेतील ७०२ संरक्षक भिंती पक्क्या आहेत. १८९ संरक्षक भिंती पक्क्या असूनदेखील तुटलेल्या आहेत. तसेच१८७ शाळेला काटेरी व तारेचे कुंपण असून ७८७ शाळांना संरक्षणक भिंतीच नसल्याचे आकडेवारीनुसार दिसून आले आहेत. अलिबाग, महाड, रोहा, सुधागड व उरण या तालुक्यातील फक्त सातच शाळांच्या संरक्षक भिंतीचे काम सुरु आहे. ज्या शाळांमध्ये संरक्षक भिंती नाहीत, त्या शाळेतील विद्यार्थ्यांची व शाळेतील मालमत्तेची सुरक्षा वाऱ्यावर आहे. संरक्षक भिंती अभावी मागील तीन वर्षापूर्वी शाळेमध्ये चोरी झाली होती. संरक्षक भिंत नसल्याने शाळेचा परिसर मद्यपींसाठी अड्डा बनत आहे. काही ठिकाणी शाळेच्या परिसरातच रात्रीच्या वेळी क्रीकेटदेखील खेळले जात आहेत. विद्या मंदिरात सुरु असलेल्या या प्रकाराला रोखण्यासाठी संरक्षक भिंत महत्वाची असताना या ठिकाणी भिंती उभारण्यास जिल्हा परिषद शिक्षण विभाग उदासीन ठरत आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या या कारभाराचा फटका शाळेतील विद्यार्थ्यांना बसत आहे.

शाळांच्या संरक्षण भिंतीवर दृष्टीक्षेप

- पक्के – ७०२
- पक्के पण तुटलेले – १८९
- काटेरी तारांचे कुंपण – १८७
- संरक्षक भिंत नाही – ७८७
- बांधकाम सुरु असलेले – ७

काटेरी तारेच्या कुंपणाचा धोका

जिल्ह्यातील १८७ शाळांना काटेरी तारेची कुंपण आहे. या कुंपणामुळे विद्यार्थ्यांना इजा होण्याची भिती अधिक आहे. त्याठिकाणी संरक्षक भिंत उभारण्यास प्रशासन उदासीन ठरत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

> शाळेच्या संरक्षक भिंतीसाठी जिल्हा नियोजन, जिल्हा परिषद सेस व सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून निधी उपलब्ध केला जातो. तसेच ग्रामपंचायतींनी संरक्षक भिंतीसाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाचे परिपत्रक आहे.
>
> -पुनिता गुरव
> शिक्षणाधिकारी, प्राथमिक विभाग रायगड जिल्हा परिषद

अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

। माणगाव । वार्ताहर ।

मुंबई-गोवा महामार्गावर एमआरएफ टायर शोरूमजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. सदरचा अपघात दि. ४ ऑगस्ट रोजी दुपारी ३:३० वाजण्याच्या सुमारास घडला. या अपघाताची फिर्याद प्रियंका प्रदीप सोनावळे (वय-२८) रा. नाणोरे ता. माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. सदर अपघाताच्या गुन्ह्याबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी कि, अपघाताची फिर्याद देणारी प्रियंका प्रदीप सोनावळे यांचे वडील मयत प्रदीप सुंदर सोनावळे (वय-५७) रा. नाणोरे ता. माणगाव हे दुपारचे जेवण करून तहसील कार्यालय माणगाव येथे स्प्लेंडर कंपनीची मोटार सायकल क्र. एम. एच. ०६ सी. एच. ५३८० या गाडीने ड्युटीवर जात असताना माणगावात एमआरएफ टायर शोरूमजवळ त्यांची गाडी आल्यावर अज्ञात वाहनावरील अज्ञात चालकाची मोटार सायकलला धडक लागून अपघात घडला.

या अपघातात मोटार सायकलस्वार प्रदीप सुंदर सोनावळे यांना गंभीर दुखापती होऊन त्यांचा मृत्यू झाला. या अपघाताच्या गुन्ह्याची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. सदर अपघाताचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री गायकवाड हे करीत आहेत.

आदिवासींबाबत शासन संवेदनशील

। पेण । वार्ताहर।

आदिवासींच्या झालेल्या नुकसानाबाबत शासन संवेदनशील आहे तसेच भूस्खलनासंदर्भात योग्य तो अभ्यास करण्याबाबत शासनास प्रस्ताव करण्यात येईल, असे प्रतिपादन पेणचे उपविभागीय अधिकारी प्रविण पवार यांनी केले. ते पेण तालुक्यातील बारीची वाडी येथील आदिवासींच्या कार्यक्रमात बोलत होते.

यावेळेस सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील, जि.प. माजी सदस्य डी.बी. पाटील, नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, पुरवठा अधिकारी सुरेश थळे, मंडळ अधिकारी प्रकाश मोकल, दिनेश पाटील आदी उपस्थित होते.

पेण महसूल विभाग व अंकुर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने एक हात मदतीचा कार्यक्रमांतर्गत परिसरातील धावटे, माळवाडी, रामराज, डुंगीचीवाडी या आदिवासी वाड्यांमधील लोकांपर्यंत शासनाच्या योजना पोहोचविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळेस मार्गदर्शन करताना अंकुर ट्रस्टच्या डॉ. वैशाली पाटील यांनी वनहक्क मान्यता कायद्यानुसार मान्यता प्राप्त जमिनीवरील नुकसानाबाबत सातबारा नसल्याचा मुद्दा मांडत हा आदिवासींवरील अन्याय असल्याचे प्रतिपादन केले. या वेळेस सामूहिक वनहक्क प्रस्तावाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

पुरवठा अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली एकुण चाळीस रेशन कार्ड आधार लिंक करून अंत्योदयकरिता प्रस्तावित करण्यात आली. कामार्ली व हमरापुर तलाठी यांनी लागणारी कागदपत्र तिथल्या तिथे देऊन संजय गांधी निराधार योजनेच्या २१ विहित नमुन्यातील अर्ज वितरीत करून या विभागाच्या योजना एकल महिला पर्यंत पोहचविण्यास मदत केली. दरडग्रस्त लोकांपर्यंत धान्य व शाळेतील मुलांना या वेळेस शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. आदिवासी कार्यकर्त्या भारती पवार व मुक्ता पवार, रघुनाथ पवार यांच्यावतीने उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

डॉ. बापूजी साळुंखे यांचा स्मृतिदिन

म्हसळा : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूरचे न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज म्हसळा, तसेच न्यू इंग्लिश स्कूल पाभरे या विद्यालयात डॉ. बापूजी साळुंखे यांचा ३६ वा स्मृतिदिन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी समीर बनकर, मच्छिन्द्र जाधव, एस. ए. वसावे, प्रा.चव्हाण, अनिल बसवत, जयवंत आवेरे, मनीषा मोरे, मंगेश कदम, कुमावत, जितेंद्र मांजरेकर, असावले, राजेंद्र महाडिक, सौ देवगावकर, सौ हाके, जमदाडे, मोरे,विद्यालयाचे शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रोडपाली खाडीपुलावर हाईटगेज

। पनवेल। वार्ताहर ।

पनवेल सायन महामार्गावर रोडपाली येथील खाडीपुल धोकादायक असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने येथे हाईटगेज उभारून अवजड वाहनांना प्रवेश बंदी केली असून हलक्या वाहनांना यावरुन यापुढे जाता येणार आहे. पुढील वर्षभरात हा पूल बांधण्याचे नियोजन सार्वजनिक बांधकाम विभागाने केले आहे.

रोडपाली येथील खाडी पूल सूमारे ५० वर्ष जुना आहे. जिर्ण अवस्थेतील पुलाच्या क्षमतेबद्दल अनेक नागरिक आणि राजकीय पुढाऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे लेखी तक्रारी केल्यावर येथील वाढते अपघात ध्यानात घेऊन हा पूलल सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने अवजड वाहनांसाठी बंद केला. हाईटेगेज लावण्याचे काम अंतिम टप्यात आहे. हाईटगेज लावल्यानंतर हा पूल हलक्या वाहनांसाठी खुला होऊ शकेल. रोडपाली खाडी पुलावर पनवेल ते सायन जाणाऱ्या महामार्गावर तीन पुल एकमेकांना आपसात जोडून रुंद पुल बनविण्यात आला आहे. यामुळे पुलजोडणीच्या कामात मोठी फट असल्याने या फटीत दुचाकीस्वारांना रात्रीच्यावेळी अपघातांना सामोरे जावे लागले.

वर्षभरात पूल बांधण्याचे नियोजन

सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंत्यांच्या चुकीच्या कामामुळे सामान्य वाहनचालकांना त्याचा त्रास होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या माहितीनूसार रोडपाली येथील जुना खाडीपुलावर दोन मार्गिका आहेत. त्याची रुंदी साडेआठ मीटर तर लांबी १४० मीटर आहे. या पुलाच्या बांधकामासाठी २७ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून पुढील काही दिवसात त्याची निविदा प्रक्रीया पार पडणार आहे. बांधकामापूर्वी पुलाचे पाडकाम आणि त्यानंतर नव्याने बांधकाम यासाठी वर्षभराचा वेळ लागण्याची शक्यता आहे.

ज्येष्ठ नागरिक संस्थेची सभा

। अलिबाग। प्रतिनिधी।

अलिबाग ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या कार्यकारिणीची सभा अलिबाग जवळील मुळे गावातील श्री संगमेश्वर मंदिराच्या सभागृहात सोमवार, ७ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली होती.

दोन नद्यांच्या संगमावर निसर्गसान्निध्यात झालेल्या सभेत ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या सभासदांसह अनेक स्थानिक नागरिकही सहभागी झाले होते. ल.नी. नातू यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सभेत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच शुक्रवार, १८ ऑगस्ट २०२३ रोजी होत असलेल्या त्रैमासिक सभेच्या नियोजनाबाबत आढावा घेण्यात आला.या सभेसाठी संस्थेचे सचिव यशवंत थळे आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपाध्यक्ष प्रफुल्ल राऊत यांनी शेवटी उपस्थित यांचे आभार मानून सभा संपन्न केले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- विद्यानगर, वरसोली येथे बंगला भाड्याने/विकणे आहे. ९८२२९९२३०४/८५३०५८७३१६
- Office staff vacancy for office in Alibag Graduate candidates can call for interview 9923750549
- फ्लॅट विकणे आहे. वक्रतुंड स.गृ.नि. संस्था रेवदंडा बँक ऑफ इंडियासमोर/बँक ऑफ बडोदासमोर, कारपेट एरिया ४४० Sqft. संपर्क : ९८३३३५६१७२.
- श्री. सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- अलिबाग शहराच्या मध्यवर्ती सोयींनी युक्त महाराष्ट्र बँकेसमोरील 1BHK भाड्याने देणे आहे. एजंट क्षमस्व. ९०९६०३९७९३
- अलिबाग येथील स्वाधार दिव्यांग प्रशिक्षण केंद्राच्या बुरूमखान वरसोली येथील वस्तीगृहासाठी २४ तास उपलब्ध राहणेसाठी निवासी पुरूष सेवक पाहिजे. स्वतःची दुचाकी असल्यास प्राधान्य नाव नोंदणी करणेसाठी संपर्क : ९०९६२१४२९४
- अलिबागमध्ये घर कामासाठी बाई/मुलगी पाहिजे ९ ते ५ पाहिजे पगार ६०००/- मोबाईल ८७६७२३९२३७
- ब्राम्हण आळी, अलिबाग येथे पहिल्या मजल्यावरील 1BHK फ्लॅट विकणे आहे. क्षेत्र- ६३० Sqft चेंढरे, अलिबाग येथे पहिल्या मजल्यावरील 2BHK फ्लॅट विकणे आहे. क्षेत्र- ९२५ Sqft संपर्क :-PROLOAN SOLUTION ९२२१६८०२८४/९७६४१४९१४३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

रिक्षा मिळाली परत

पनवेल : पनवेल शहर परिसरातून चोरी गेलेली रिक्षा मानपाडा पोलिसांना सापडल्याने त्यांनी ती पुन्हा शासकीय पूर्तता करून रिक्षा मालकाच्या ताब्यात दिली आहे. पनवेल शहरातील लोखंडी पाडा, अशोक बाग परिसरात नवनाथ खांडपेकर यांनी त्यांची रिक्षा (क्र एमएच ४६ एससी ३६८०) हि उभी ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर रिक्षा चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. याबाबत पनवेल शहर पोलिसांचे पथक शोध घेत होते. तसेच या रिक्षाच्या चोरी बाबत परिसरातील पोलीस ठाण्यात कळवले होते. दरम्यान मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सदर रिक्षा बेवारस स्थितीत उभी करून आढळल्याने त्यांनी ती ताब्यात घेतली. याबाबत चौकशी केली असता ती पनवेल येथून चोरी झाल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सदर रिक्षामालकाला बोलावून शासकीय पूर्तता करून रिक्षा मूळ मालकाच्या ताब्यात देण्यात आली.

शैक्षणिक साहित्याचे वाटप

। पोयनाड । वार्ताहर ।

राजिप शाळा बसणीवाडी येथे सोमवार दि. ७ ऑगस्ट रोजी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. आजकाल तरुण मुले समाजासाठी काही करत नाही असे आपण सर्वत्र ऐकत वं पाहत असतो. मात्र बसणीवाडी शाळेला मदत देणारे हात कोणत्याही मोठ्या संस्थेचे नसून अशाच गरीबीतून पुढे शिकून मोठे झालेल्या तरूणांचे आहेत. अलिबागमधील काही होतकरू तरूण एकत्र येऊन त्यांनी बसणीवाडी शाळेस शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

सदर मदत अनिकेत पाटील, तेजस पालकर, अभिषेक पाटील, ऋतुजा पाटील, सुयोग पाटील, दर्शन झोरे, हर्षवर्धन पाटील यांनी केली. सदर मुलांचे रश्मी राऊत यांच्याशी भेट तौसिन छापेकर यांनी घडवून आणली होती.

सिद्धेश्वर शाळेचा वर्धापनदिन

पाली/गोमाशी : सुधागड तालुक्यातील शाळा सिद्धेश्वरचा १४८ वा वर्धापन दिन सोहळा ६ ऑगस्ट रोजी अनंत पोंगडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या वर्धापन दिनानिमित्त १ ली ते ७ वी, १० वी ,१२ वी,पदवीधर विद्यार्थ्यांना सत्कार तसेच शिक्षकवृंदांचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी समृद्धी यादव, सुजाता यादव, मारुती यादव, नरेश यादव, बापूजी क्रिकेट क्लब, दत्तगुरु मित्रमंडळ, उत्कर्ष मित्र मंडळ, ग्रीन गोल्ड व्हॅली, कायम ठेव बक्षिस कै.भालचंद्र दुर्वे फंड यांचेकडून बक्षिसे प्राप्त झाली. तसेच सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजनेअंतर्गत १३ विद्यार्थीनींना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास अनंत पोंगडे, आशिका पवार, शरद किंजावडे, समृद्धी यादव, सुरेश जाधव, राजन पंडित, प्रभाकर कोनकर, अविनाश कोनकर, संजय शिंदे, सुनिल पोंगडे, कैलास म्हात्रे, मंगेश यादव आदि उपस्थित होते.

तालुकास्तरीय स्पर्धेत परहूरपाडा केंद्राचे यश

। अलिबाग ।वार्ताहर

रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ उपशाखा अलिबाग यांनी तालुक्यास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते या वक्तृत्व स्पर्धेत परहुरपाडा केंद्रातील कोपर व चरी शाळेने सहभाग घेऊन घवघवीत यश संपादन केल.

शुक्रवार ४ ऑगस्ट रोजी राजिप शाहा कुरूळ येथे या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये कोपर शाळेतील गट क्र.१ मधून निर्जरा प्रकाश ठाकूर, द्वितीय क्रमांक तर तिसरी व चौथीच्या गटातून दृष्टी प्रशांत ठाकूर हिचा इंग्रजी वक्तृत्वामध्ये प्रथम क्रमांक तसेच तिसरी व चौथीच्या गटातून मराठी वक्तृत्वामध्ये शुभ्रा चंद्रहास ठाकूर हिचा द्वितीय क्रमांक आला.

चरी शाळेतील गायत्री शामल पाटील हिचा तृतीय क्रमांक आला. सदर विद्यार्थ्यांना स्नेहल पाटील, श्री. मोरे तसेच रेश्मा पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले होते.

केंद्र प्रमुख अनिषा पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

■ स्वातत्र्यांचा अमृत महोत्सवाचा समारोपा निमित्त मेरी माटी मेरा देश अभियान अंतर्गत पनवेल महानगर पालिका वतीने हातात दिवे घेऊन शपथ घेण्यात आली.

तळा येथे मेरी मिट्टी मेरा देश कार्यक्रम

तळा : तळा नगरपंचायत कार्यालयात बुधवार मेरी माटी मेरा देश अभियान राबविण्यात आले.या अभियानांतर्गत उपस्थित सर्व मान्यवरांनी पंचप्रण शपथ घेतली.यामध्ये भारतास २०४७ पर्यंत आत्मनिर्भर आणि विकसित राष्ट्र बनविण्याचे स्वप्न साकार करू,गुलामीची मानसिकता मुळापासून नष्ट करू,देशाच्या समृद्ध वारशाचा गौरव करू,भारताची एकात्मता बलशाली करू आणि देशाचे संरक्षण करणाऱ्यांप्रती सन्मान बाळगू,देशाचे नागरिक म्हणून सर्व कर्तव्याचे पालन करू अशी शपथ घेण्यात आली. याप्रसंगी मुख्याधिकारी माधुरी मडके, नगराध्यक्षा अस्मिता भोरावकर,उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांसह सर्वपक्षीय नगरसेवक, नगरसेविका,आशा सेविका व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोर्लईत नेत्र तपासणी शिबीर

। रेवदंडा। वार्ताहर ।

मुरूड तालुक्यातील कोर्लई येथे मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबीर कोर्लई ग्रामपंचायत सभागृहात श्री सत्यसाई संघटना, मुंबई मेट्रो प्रदेश, महाराष्ट्र आणि आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांच्या तर्फे मंगळवार दि. ८ ऑगस्ट घेण्यात आले. या शिबीरासाठी श्री सत्यसाई संघटना, मेट्रो प्रदेश जिल्हा अध्यक्ष कैलास गावडे यांचे मार्गदर्शनाखाली सुरेश मेहेर, नरेश पटेल, शिवराम पटेल, शरद वरसोलकर, रोहन पाटील, सुबोध भोसले, देवानंद हाले, अर्चना पारखी, विकास हाले, जागृती हाले यांनी शिबीर यशस्वी होण्यासाठी मदत केली. तर आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल यांचे वतीने प्रकाश पाटील, डॉ अर्पणा हरी, मृण्मयी जाधव, सोनाली पंदेरे, ज्ञानोबा कांबळे, व सरपंच राजश्री मिसाळ यांचे सहकार्य लाभले. या शिबीरात एकूण १२६ जणांचे नेत्र तपासणी करण्यात आली यामध्ये एकूण ३० जणांना मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात येणार आहेत.

‘सोलनपाड्याचे स्थलांतर करा’

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील जामरूख ग्रामपंचायत हद्दीतील सोलनपाडा येथील पाझर तलावाच्या बांधामधून पाण्याची गळती सुरु आहे. त्यामुळे स्थानिक सोलनपाडा ग्रामस्थ पावसाळ्यात जीव मुठीत घेऊन वास्तव्य करून राहतात. मात्र यावर्षी धरणाच्या बांधामधून होणारी पाण्याची गळती वाढली आहे. दरम्यान, स्थानिक गावाचे विस्थापन करण्याचा विचार प्रशासन करीत आहे, मात्र आपल्या गावाचे पुनर्वसन याच परिसरात करण्यात यावे अशी मागणी करणारे निवेदन स्थानिक ग्रामस्थांनी रायगड जिल्हाधिकारी यांना दिले आहे.

जून पाठोपाठ जुलै महिन्यात पडलेल्या प्रचंड पावसामुळे सोलनपाडा पाझर तलावचे मुख्य मातीच्या बांधामधून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती सुरु झाली आणि मोठी दुर्घटना होऊ नये यासाठी स्थानिक ग्रामस्थ यांनी आपल्या गावातील उंच भागात बाहेर घरे बांधलेल्या नातेवाईक यांच्या घरी मुक्काम करण्यास सुरुवात केली होती. प्रशासन जागरूक झाल्याने २२ जुलै रोजी पाझर तलावातील पाण्याचा विसर्ग सांडव्याची भिंत तोडून करण्यात

आला. त्यामुळे पाझर तलावातील पाण्याची क्षमता तब्बल ३० टक्के कमी झाली.मात्र ग्रामस्थांच्या मनात इर्शाळवाडीच्या दुर्घटनेनंतर प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे तेथे पाहणीसाठी आ. महेंद्र थोरवे यांच्याकडे विस्थापन करण्याची सर्व ग्रामस्थांनी मागणी केली आहे.

पिल्लई महाविद्यालयात वृक्षारोपण

। रसायनी । वार्ताहर ।

पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट व पिल्लई एचओसी कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय रसायनी यांच्या संयुक्त विद्यमानाने बुधवार ९ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात विविध जातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. याप्रसंगी श्रीमती लता, संदेश मेंगाळ, अरुण जाधव, श्रीमती अनिता, श्रीमती कलावती, श्रीमती सुलोचना व महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाताळगंगा नदी व पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून पाच हजार वृक्षलागवड मोहिम सुरू आहे. तसेच खालापूर तालुक्यातील गोरगरीब, गरजूंना विविध माध्यमांतून सहकार्य करण्याचे काम सुरू आहे.त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

पोलीसांकडून जनजागृती

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत लोहमार्ग पोलिसांकडून रेल्वे प्रवास करताना घ्यावयाची काळजी याबाबत सतत मार्गदर्शन केले जाते. स्थानकातील प्रवासी यांच्यानंतर रेल्वेने प्रवास करणारे प्रवास करणारे विद्यार्थांना सुरक्षित प्रवास व्हावा यासाठी जनजागृती मोहीम राबविण्यात आली. पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संभाजी यादव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कर्जत रेल्वे पोलिसांची हद्द वांगणी ते खोपोली अशी असून या दरम्यान असलेल्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी मुख्याध्यापक राणे, उपमुख्याध्यापक नलगे, राजेंद्र बागुल, नितीन मोहिते हे उपस्थित होते.

आदिवासी दिन साजरा

। तळा। वार्ताहर ।

तळा तालुक्यातील मौजे खांबवली येथे बुधवार ९ ऑगस्ट रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात आदिवासी समाजाचे आदर्श असलेल्या हुतात्मा नाग्या कातकरी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

तसेच यावेळी आदिवासी बांधवांकडून सामूहिक आदिवासी प्रतिज्ञा घेऊन पारंपरिक आदिवासी गीत गायन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी समाजाचे अध्यक्ष गोविंद पवार,उपाध्यक्ष चंदर पवार, सचिव राजू जाधव, शेणवली सरपंच निकिता गायकवाड, उपसरपंच छाया कजबळे यांसह तालुक्यातील आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

एकता परिषदेची रॅली

। पेण । वार्ताहर।

अनेक वर्षांपासून आदिवासी समाजावर होणाऱ्या अन्यायाबाबत भारतीय मुक्ती मोर्चा, बहुजन क्रांती यांच्या माध्यमातून पुकारण्यात आलेल्या भारत बंदच्या अनुषंगाने राष्ट्रीय आदिवासी एकता परिषद यांनी सोमवारी पेणमध्ये रॅलीचे आयोजन केले होते. रॅलीत मणिपूर येथे महिलांवरील होत असलेल्या अत्याचारांच्या निषेधार्थ घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी नंदा म्हात्रे, विजय आवास्कर, लक्ष्मण निरगुडा, हरेश विर, नरेश सोनावणे, जयस्वाल, समीर घायतले आदी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना
(हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरीता संपादित होणाऱ्या खालीलप्रमाणे नमूद जमिनीच्या साडेबावीस टक्के योजनेंतर्गत वाटप करण्यात आलेली आहे.

अ. क्र.	युनिट/ निवाडा क्र.	सर्व्हे क्र./ हिस्सा क्र.	संपादित क्षेत्र	सद्यस्थितीतील भूधारकांची नावे	क्षेत्र (चौ. मी.)	शेरा
०१	ओवळे–१८५	१३१/अ/९ १४०/९ ४३/५ ४३/८ ७८/५ ७८/९	०–०४–० ०–०२–८ ०–२७–१ ०–०८–० ०–०७–८ ०–००–८	१. श्री. वसंत हाडकू भगत २. श्री. शाम हाडकू भगत ३. श्रीमती चंद्रभागा उर्फ संगीता रामभाऊ चौधरी ४. श्रीमती लीलाबाई मारुती चौधरी ५. श्री. मदन हाडकू भगत ६. श्रीमती ललिता राजेंद्र घरत	१६१०.०० चौ.मी.	भूखंड क्र. ६८, से.०८ क्षेत्र १६१०.०० चौमी या भूखंडाचे वाटप दि. २०/१०/२०१५ रोजी करण्यात आले असून भाडेपट्टा करारनामा दि. ११/०२/२०२२ झालेला आहे.
०२	पारगांव डुंगी–१६८	१/११ १/१६ १/९ ३/२७ ४४/११	०–०८–४ ०–१६–५ ०–१३–३ ०–०६–५ ०–०६–४			
०३	ओवळे–१८४	१३१/ए/११ १५३/३ ४०/२७ ४२/१३ ६३/२ ७१/६	०–०४–५ ०–१३–० ०–११–० ०–३४–९ ०–२६–० ०–१०–६	श्री. जनार्दन कृष्णा पाटील व इतर ३६	१५८०.०० चौ.मी.	भूखंड क्र. ६७. से ०८ क्षेत्र १५८०.०० चौमी या भूखंडाचे वाटप दि. २०/१०/२०१५ रोजी करण्यात आले असून भाडेपट्टा करारनामा दि. १८/०२/२०२१ झालेला आहे.

संचिका क्र. ओवळे १८५ मधील एकत्रित केलेले **भूखंड ६८, सेक्टर–०८, क्षेत्र– १६१० चौ.मी.. या पात्रतेन्वये १) श्रीमती चंद्रभागा उर्फ संगीता रामभाऊ चौधरी, २) श्री. मदन हाडकु भगत, ३) श्रीमती. ललिता राजेंद्र घरत, ४) श्रीमती लीलाबाई मारूती चौधरी ५) श्री. वसंत हडकु व ६) श्री. शाम हडकु भगत** यांना दि. २०/१०/२०१५ रोजीच्या वाटपपत्राद्वारे/संगणकीय सोडतीद्वारे भूखंड क्र. ६८, सेक्टर–०८, क्षेत्र १६१०.०० चौमी हा भूखंड पुष्पकनगर (दापोली) येथे वाटपित करण्यात आलेला आहे. सदर भूखंडाचा भाडेपट्टा करारनामा दिनांक– ११/०२/२०२२ रोजी निष्पादीत करण्यात आला आहे. भूखंड क्र. ६८, सेक्टर–०८, क्षेत्र– १६१०.०० चौ.मी. **हा भूखंड मे. मॅट्रीक्स इन्फ्रा तर्फे भागिदार १. श्री. राहूल गणेश मेहता २. श्री. जयंतीलाल रामजी मसुरिया** यांच्या नावे त्रिपक्षीय करारनाम्याद्वारे ५०% अविभाजित क्षेत्र हस्तांतरीत करण्यात आले आहे. व संचिका क्र. ओवळे–१८४ मधील एकत्रित केलेले **भूखंड ६७, सेक्टर–०८, क्षेत्र– १५८० चौ.मी.,** या पात्रतेन्वये **श्री. जनार्दन कृष्णा पाटील व इतर ३६** यांना दि. २०/१०/२०१५ रोजीच्या वाटपपत्राद्वारे/संगणकिय सोडतीद्वारे भूखंड क्र.६७, सेक्टर–०८, क्षेत्र १५८०.०० चौमी हा भुखंड पुष्पकनगर (दापोली) येथे वाटपित करण्यात आलेला आहे. सदर भूखंडाचा भाडेपट्टा करारनामा दिनांक– १८/०२/२०२१ रोजी निष्पादीत करण्यात आला आहे. तद्नंतर सदर **भूखंड क्र. ६७, सेक्टर–०८, क्षेत्र–१५८०.०० चौ.मी. हा भूखंड मे. मॅट्रीक्स इन्फ्रा तर्फे भागिदार १. श्री. राहूल गणेश मेहता २. श्री. जयंतीलाल रामजी मसुरिया** यांच्या नावे त्रिपक्षीय करारनाम्याद्वारे १००% अविभाजित क्षेत्र हस्तांतरीत करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर **भूखंड ६७+६८ सेक्टर–०८, क्षेत्र ३९८९.२७ चौ.मी.,** या भूखंडाचे एकत्रिकरण करण्यात आले आहे. तरी १) श्रीमती चंद्रभागा उर्फ संगीता रामभाऊ चौधरी २) श्रीमती ललिता राजेंद्र घरत ३) श्रीमती लिलाबाई मारुती चौधरी यांनी सदर भूखंडातील आपला अविभाजित हिस्सा १) श्री. मदन हाडकु भगत २) श्री. वसंत हडकु भगत ३) श्री. शाम हडकु भगत यांच्या लाभांत दि. ०७.०६.२०२३ रोजीच्या हक्कसोडपत्राद्वारे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. खालील तक्त्यामध्ये हक्क सोडणारे व हक्क प्रदान करणारे नमुद करण्यात आले आहेत:

हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे	हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे
१) श्रीमती चंद्रभागा उर्फ संगीता रामभाऊ चौधरी, २) श्रीमती ललिता राजेंद्र घरत, ३) श्रीमती लीलाबाई मारूती चौधरी	**१) श्री. मदन हाडकु भगत, २) श्री. वसंत हडकु भगत ३) श्री. शाम हडकु भगत**

उपरोक्त दाव्यामधील (हक्कसोड) नूसार सिडकोकडून केवळ खालील व्यक्तीच भाडेपट्टेदार म्हणून **१) श्री. मदन हाडकु भगत, २) श्री. वसंत हडकु भगत ३) श्री. शाम हडकु भगत आणि मे. मॅट्रीक्स इन्फ्रा तर्फे भागिदार १. श्री. राहूल गणेश मेहता २. श्री. जयंतीलाल रामजी मसुरिया** यांच्या नावाची नोंद घेण्यात येईल. उपरोक्त हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी करारनामा करण्यात आलेल्या भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत त्यांची नावे वगळून जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा व्यक्तींच्या नावे सिडकोकडून नोंद घेण्यात येईल. आजच्या तारखेपासून ३० दिवसानंतर कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

वरील भाडेपट्टा करारनामा करण्यात आलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभांत हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनूसार यापुढे साडेबावीस टक्के योजनेंतर्गत हक्कसोड पत्राद्वारे हस्तांतरणाची कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करुन सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि) विभाग, तळ मजला, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई– ४०० ६१४ यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत / तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजून हक्कसोड पत्राची पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अति. भूमी व भूमापन अधिकारी
(नमुंआंवि)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२३५/२०२३–२४

कर्जत नगरपरिषद, कर्जत जि.रायगड
फेर ई निविदा
आरोग्य विभाग

जावकक्र/क.न.प./आरोग्य विभाग/१५५८/२३-२४ दिनांक ०९/०८/२०२३

कर्जत नगर परिषद क्षेत्रांतील भटक्या श्वानांना पकडून त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व त्यांना रेबिज प्रतिबंधक लस देणे कामी ई निविदा सूचना शासनाच्या http//www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक २७/०७/२०२३ ते दिनांक ०२/०८/२०२३ या कालावधीत प्रसिद्ध करण्यांत आलेली होती. सदर कामासाठी खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यांत येत आहे. तरी सदर कामासाठी डाऊन लोड करण्याचे दिनांक १०/०८/२०२३ सकाळी ११.०० ते दि.१७/०८/२०२३ सायं ५.०० वाजे पर्यंत आहे व दिनांक १८/०८/२०२३ रोजी सकाळी ५.०० वाजता निविदा उघडण्यांत येतील.

सही/-
(वैभव गारवे)
मुख्याधिकारी
कर्जत नगरपरिषद, कर्जत

सही/-
(सौ.सुवर्णा केतन जोशी)
अध्यक्ष
कर्जत नगरपरिषद, कर्जत

जाहीर नोटीस दिनांक : ०९/०८/२०२३

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-टेकाळी, ता.अलिबाग, येथील गट नं.१३२, क्षेत्र ०-२६-२० हे.आर., पो.ख.०-०३-७० हे.आर., एकूण क्षेत्र ०-२९-९० हे.आर., आकार १.०९ रू.पै., ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.शशीकांत पांडुरंग थळे, रा.मु.आवास, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०९/०८/२०२३

सही/-
(ॲड.संजय द.म्हात्रे)
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड

जाहीर नोटीस
अलिबाग येथील मा.दिवाणी न्यायाधीश व स्तर सो यांच्या न्यायालयात

चौकशी अर्ज ११०/२०२३
नि.७/ड

श्रीमती.गुलशन आजिज पठाण, वगैरे — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मयत आजिज उमर पठाण त्यांचा मृत्यू दिनांक २५/०५/२०२३ रोजी मौजे मु.सोगाव, पो.मापगाव, ता.अलिबाग जि.रायगड येथे ग्रामपंचायत हद्दीत मृत्यू झाला आहे. असून त्यांस अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत.

मयत आजिज उमर पठाण यांचे वारस म्हणून दाखला मिळावा याकरीता अर्जदार यांनी या मा.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदाराच्या मागणीप्रमाणे त्यांना मयत आजिज उमर पठाण यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तीचा, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत किंवा दि.२१/८/२०२३ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचाही, कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे मयत आजिज उमर पठाण यांचे वारस म्हणून वारस दाखला देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात येऊन मा.कोर्ट आवश्यक तो वारस दाखला देणेचा हुकुम अर्जदार यांचे लाभांत करेल त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि.९ माहे, ०८, २०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

कोर्टाचा शिक्का

सही/-
लिपिक
सही/-
दिवाणी न्यायाधीश व
स्तर सो अलिबाग

सही/-
अधिक्षक
दिवाणी न्यायाधीश व
स्तर सो अलिबाग

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

Sr. No.	Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/	Description	Estimated Cost	Submission Date
1	e-Tender-21/23-24/ **RFx No. 7000028180**	Work of Replacement of 3 no of New 400 kV CB at 400 kV Nagothane Substation under 400 KV R.S. (O&M) Division, Nagothane under EHV O&M Circle, Panvel.	Rs. 5,86,424/-	17.08.2023 up to 10:00 Hrs

EMD 1% of **Estimate Cost** & **Tender Fee:** Rs. 500/- + GST.
For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
Contact Person: Mitesh Goyal (DY. EE) Mob No. 9461456635
e-mail ID: **ee7230@mahatransco.in**
Note: All eligible Suppliers/ Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
400kV R.S. (O&M) Dn., Nagothane

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

ई-खुली निविदा मागविणारी सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. च्या वतीने वरि. विभागिय विद्युत अभियंता केआरसीएल, रत्नागिरी, हे खालील कामासाठी ई-खुली निविदा मागवित आहेत. **केआरसीएल च्या रत्नागिरी विभागातील रत्नागिरी स्थानकावरील प्रस्तावित कंटेनर यार्डसाठी ओएचई मध्ये बदल. (निविदा क्र. केआर/आरएन/ईएल/टी/3A/2023 दिनांक: 10/08/2023) अंदाजे मूल्य: ₹ 33,82,195/-** (जीएसटी वगळता). **निविदा अर्जाचे शुल्क:** नाही, **इरठे: ₹ 67,700/- निविदा ऑन लाईन जमा करण्याचा शेवटचा दिनांक आणि वेळ: 24/08/2023 रोजी 15.00 वा.** पर्यंत. अधिक माहितीसाठी वरी. क्षेत्रिय विद्युत अभियंता ह्यांचे कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी ह्यांच्याशी संपर्क करा किंवा **(www.ireps.gov.in)** या संकेतस्थळाला भेट द्या:

जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत श्रीमती मेघा दिनेश सालीयन, रा.स्वामी धाम, प्लॉ नं.९, पारिजात सोसायटी, रायवाडी कॉम्पलेक्स, चेंढरे, अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड आणि श्रीमती निता प्रितम मंत्री, रा.रूम.नं.३०१, बी विंग वरळी गोपचार सोसायटी, डॉ.ए.बी.रोड, सिटी बेकरी समोर, वरळी मुंबई-४०० ०१८ यांचेकडून विकत घेण्याचे ठरविलेले आहे व त्याबाबत सदरील मालकांशी प्राथमिक चर्चा केलेली आहे.

मिळकतीचे वर्णन

गाव	भुमापन क्र.	क्षेत्र हे.आर.	आकार रू.पैसे
मौजे खानाव, ता.अलिबाग जि.रायगड	६९/१/क	०-१५-५०	४.००

तरी सदरील मिळकतीसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, वहिवाट, कुळ, ताबा, कब्जा, तारणगहाण, लिज, लिन, साठेकरार, बोजा, वहिवाटीचे मार्ग अथवा इतर कसल्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत योग्य त्या कागदपत्रांसह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत सादर करावी. वरील मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे. असे समजून आमचे अशिल सदरील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही हे कळावे.

अलिबाग,
दिनांक : ०९/०८/२०२३

ॲड.जयेश अ.जोशी
९३२, टिळक रोड,अरविंद
आर्केड, दुसरा मजला,
अलिबाग, जि.रायगड

कमळ ✓सहकार क्षेत्रातील विश्वासार्ह नाव
नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग
३१ वा वार्षिक अहवाल सन २०२२-२०२३
KNS PATSANSTHA

रजि.नं.आर.जी.डी./ए.बी.जी./आर.एस.आर./
सी.आर./३०८/दि.१८/०३/१९९२
३१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना
-फक्त सभासदांसाठी-

दि. ०७/०८/२०२३

कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग या संस्थेच्या सभासदांची **३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २६ ऑगस्ट २०२३ रोजी होरायझन हॉल, बुरुमखाण, खडताळ पूल, अलिबाग येथे सायंकाळी ४.३० वाजता** संस्थेच्या कार्यक्रम पत्रिकेवरील कामकाजासंबंधी विचार करण्यासाठी होणार आहे. तरी संस्थेच्या सर्व सभासदांनी सदर सभेस उपस्थित राहावे ही विनंती.

सभेची कार्यक्रमपत्रिका

१ संस्थेच्या दि.१७ सप्टेंबर २०२२ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२ दि.३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक स्वीकृत करणे.
३ मा. वैधानिक लेखापरीक्षक यांचा सन २०२२/२०२३ या आर्थिक वर्षाच्या शासकीय हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेवून तो स्वीकारणे.
४ मा. वैधानिक लेखापरीक्षक यांचा सन २०२२/२०२३ या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण हिशोब तपासणी दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
५ व्यवस्थापन समितीने शिफारस केलेल्या दि. ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या नफावाटणी प्रस्तावास व लाभांश वाटपास मंजुरी देणे.
६ मा. संचालक मंडळाने सन २०२३-२४ करिता शिफारस केलेल्या शासन मान्य नामतालिकेतील वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे व शासन नियमानुसार मेहनताना देणेबाबत मंजुरी देणे.
७ सन २०२३/२०२४ व सन २०२४/२०२५ या आर्थिक वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षक नियुक्तीबाबत निर्णय घेणे.
८ सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे तसेच सन २०२२-२३ चे अंदाज पत्रकापेक्षा अधिक झालेल्या खर्चास मान्यता देणे.
९ संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांचे कर्जासंबंधीच्या माहितीची नोंद घेणे.
१० सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात शासनमान्य एकरक्कमीकर्ज योजनेंतर्गत सवलत दिलेल्या कर्ज रक्कमांचा आढावा घेवून तद्संबधी संचालक मंडळाच्या निर्णयास कार्योत्तर मान्यता देणे.
११ म. स.सं अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील नियम ४९ मधील तरतुदीनुसार संस्थेचा वसुलीचा हक्क अबाधित ठेवून मा. वैधानिक लेखा परीक्षक यांनी प्रमाणित केलेली वसूल न होणारी थकीत कर्जखाती निर्लेखन करणेस मान्यता देणे.
१२ सन २०२२ ते २०२३ या आर्थिक वर्षातील सामाजिक बांधिलकी निधी समितीच्या इतिवृत्ताची नोंद घेणे.
१३ संस्थेच्या मुख्यकार्यालयामधील काही विभागांसाठी अतिरिक्त जागांचे खरेदी करावयाच्या प्रस्तावास मान्यता देणे.
१४ दैनंदिन कामकाजाच्या अनुषंगाने विविध धोरणास मान्यता देणेबाबत निर्णय घेणे.
१५ मा.संचालक मंडळाने सदरचे अहवालात सादर केलेल्या संस्थेच्या पोटनियम दुरुस्तीच्या प्रस्तावाचे शब्दरचनेस मान्यता देणे.
१६ संस्थेच्या नवीन शाखाविस्ताराबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.
१७ अक्रियाशील सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१८ मा. अध्यक्षांचे परवानगीने आयत्यावेळेचे उपस्थित विषयांवर चर्चा करणे.

सभा : शनिवार दि. २६ऑगस्ट २०२३
स्थानः होरायझन हॉल, खडताळ पूल, बुरुमखाण, अलिबाग - रेवस रोड

सौ.गीतांजली अविनाश ओक
सेक्रेटरी

विशेष सुचना-

१. संस्थेच्या पोटनियमाप्रमाणे सभेसाठी आवश्यक असणाऱ्या गणसंखेच्या (कोरम) अभावी सभा तहकूब झाल्यास वरील सभा त्याच दिवशी पूर्व घोषित वेळेनंतर अर्ध्या तासाने सदरची सभा घेतली जाईल व त्या सभेस गणसंख्येचे (कोरमचे) बंधन असणार नाही.
२. ज्या सभासदांना सभेच्या विषयांबाबत प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि. १९/०८/२०२३ पर्यंत मध्यवर्ती कार्यालय अथवा शाखेच्या कार्यालयीन वेळेत, लेखी स्वरुपात अर्ज दयावेत व अर्जामध्ये सभासद क्रमांक व संपूर्ण नाव नमूद करून पाठवावेत. सभेच्या विषय पत्रिकेतील विषयांबाबतचे प्रश्न विचारात घेतले जातील.
३. वार्षिक सर्वसाधारण सभेची सविस्तर नोटीस व दि. ३१ मार्च २०२३ अखेर संस्थेचा ताळेबंद, नफातोटा पत्रक व वार्षिक अहवालाची संपूर्ण माहिती मुख्यालयासह सर्व शाखांच्या नोटीस बोर्डवर व स्थानिक वर्तमानपत्रात तसेच संस्थेच्या वेबसाईट https://www.knspatsansthaalibag.com सभासदांच्या माहितीसाठी प्रसिद्ध केली आहे.
४. सभासदांनी आपल्या पत्यात बदल झाला असल्यास तसेच संपर्क, दुरध्वनी अथवा मोबाईल क्रमांक तसेच के.वाय.सी. कागदपत्रे याची अद्ययावत माहिती संस्थेस द्यावी. तसेच नामांकन सुविधा केली असल्याची खात्री करावी.
५.सन्माननीय सभासदांनी सभेस येताना कृपया आपला फोटो ओळखपत्राचा पुरावा (आधारकार्ड/पॅनकार्ड/मतदान/ओळखपत्र/बँक पासबुक/ शासकीय ओळखपत्र) सोबत आणावे. त्याशिवाय सभेत प्रवेश दिला जाणार नाही.
६. पोस्ट/ कुरिअर सेवेच्या विलंबामुळे सभेची सूचना वेळेत न मिळाल्यास हीच सभेची सूचना समजावी.
७. ज्या सभासदांना वार्षिक अहवालाचीप्रत हवी असेल त्यांनी ती संस्थेच्या मुख्याकार्यालयात तसेच संस्थेच्या शाखांमध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध असेल.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

जाहीर नोटीस दिनांक : ०९/०८/२०२३

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-आवास, ता.अलिबाग, येथील गट नं.५२१, क्षेत्र ०-१७-५० हे.आर., पो.ख.०-००-७० हे.आर., एकूण क्षेत्र ०-१८-२० हे.आर., आकार ४.६२ रू.पै., ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक १) शांताबाई गोपाळ राणे, २) वैशाली सुरेश म्हात्रे दोघीही रा.मु.आवास, ता.अलिबाग जि.रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या ह

निवडक

बीसीसीआयचा कर

नवी दिल्ली, बीसीसीआय हे जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेट बोर्ड आहे हे सर्वांना माहितीच आहे. आयपीएलच्या मीडिया राईट्स आणि ओटीटी राईट्सच्या विक्रीतून बीसीसीआयने जवळपास ५० हजार कोटींचा गल्ला कमावला होता. आता याच कमाईच्या जोरावर बीसीसीआयने २०२१ - २२ या आर्थिक वर्षात जवळपास १ हजार १५९ कोटी रूपये निव्वळ आयकर भरला आहे. विशेष म्हणजे ही रक्कम ३७ टक्क्यांनी जास्त आहे.

इशांतची चिंता वाढली

नवी दिल्ली: भारतीय क्रिकेटपटू इशान किशनची चिंता वाढली आहे. वेस्ट इंडिज दौऱ्यावर पहिल्यांदाच त्याला बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. इशान किशन पहिल्या दोन कसोटी खेळला. त्यानंतर तीन एकदिवसीय सामने झाले तेव्हा तो तिथेही सतत खेळताना दिसला. येथे त्याने अर्धशतके झळकावली.मात्र त्यानंतरच्या सामन्यात तो फारसा प्रभावी ठरला नाही.त्यामुळे त्याला यावेळी वगळण्यात आले.

मनोज पुन्हा खेळणार

कोलकाता : क्रिकेटपटू मनोज तिवारीने निवृत्तीचा निर्णय बदलला असून तो पुन्हा बंगालकडून देशांतर्गत क्रिकेट खेळताना दिसणार आहे. मात्र, त्याची अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही. मनोज तिवारीने बंगाल क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष स्नेहशिष गांगुली यांच्याशी बोलून आपली निवृत्ती मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. होता मनोजच्या निवृत्तीच्या निर्णयामुळे बंगालची मधली फळी कमकुवत झाली होती.

नीरज चोप्रावर भिस्त

नवी दिल्ली : ऑलिम्पिक विजेता आणि यंदाच्या हंगामात दुखापतीवर मात करून सातत्य राखणारा भालाफेकपटू नीरज चोप्रा आगामी जागतिक अजिंक्यपद ॲथलेटिक्स स्पर्धेत भारतीय संघाचे मुख्य आकर्षण असेल. जागतिक ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी नीरजसह भारताचा २८ सदस्यीय संघ मंगळवारी जाहीर करण्यात आला. जागतिक मैदानी स्पर्धा हंगेरीत बुडापेस्ट येथे १९ ते २७ ऑगस्ट या कालावधीत होणार आहे.

इंझमाम संघ निवडणार

कराची : पाकिस्तान क्रिकेट संघाला आशिया चषक , विश्वचषक २०२३ सारख्या दोन मोठ्या स्पर्धा खेळायच्या आहेत, त्यामुळे संघाला एका उत्तम निवडकर्त्याची गरज होती. पीसीबीने ही जबाबदारी माजी कर्णधार इंझमाम-उल-हककडे सोपवली असून आता हा माजी कर्णधार आशिया चषक आणि विश्वचषक स्पर्धेसाठी आपला राष्ट्रीय क्रिकेट संघ निवडणार आहे. पीसीबीने इंझमामची मुख्य निवडकर्ता म्हणून नियुक्ती केली आहे.

तिसरा टी २० सामना भारताने जिंकला

सूर्याची बॅट तळपली

। प्रॉव्हिडन्स । वृत्तसंस्था । भारताने तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात वेस्ट इंडिजचा सात गडी राखून पराभव करून पाच सामन्यांच्या मालिकेत जबरदस्त पुनरागमन केले. करो या मरो, अशी स्थिती असलेल्या या सामन्यात भारताला कोणत्याही परिस्थितीत जिंकणे आवश्यक होते. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने १५९ धावा केल्या. प्रत्युत्तरात एकट्या सूर्यकुमार यादवने अर्ध्याहून अधिक धावा केल्या आणि संघाच्या विजयात मोलाची भर घातली.

५० बळी घेणारे खेळाडू

कुलदीप यादवपूर्वी युझवेंद्र चहल, जसप्रीत बुमराह, आर अश्विन आणि भुवनेश्वर कुमार यांच्या नावावर सर्वात जलद ५० बळी घेण्याचा विक्रम होता. चहलने ३४ सामन्यात ५० तर बुमराहने ४१ सामन्यात ५० बळी पूर्ण केले. त्याचबरोबर अश्विनने ४२ आणि भुवनेश्वर कुमारने ५० सामन्यांमध्ये हा टप्पा पार केला होता. युजवेंद्र चहल हा टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताकडून सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज आहे. दुसऱ्या क्रमांकावर भुवनेश्वर कुमार आहे. दुसरीकडे, त्याचबरोबर सर्वात कमी चेंडूत ५० बळी घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत कुलदीप यादव चौथ्या क्रमांकावर पोहोचला आहे.

कुलदीप यादवने रचला इतिहास

कुलदीप यादवने वेस्ट इंडिजविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात ४ षटकात २८ धावा दिल्या. त्याचबरोबर वेस्ट इंडिजच्या ३ फलंदाजांना आपल्या गळाला लावले. यासह त्याने ५० टी-२० आंतरराष्ट्रीय विकेट्सही पूर्ण केल्या. कुलदीपने ३० सामन्यांच्या २९ डावांमध्ये १४.२८ च्या सरासरीने आणि ६.४७ च्या इकॉनॉमीने टी-२० आंतरराष्ट्रीयमध्ये ५० विकेट्स पूर्ण केल्या. या दरम्यान कुलदीपने युजवेंद्र चहलचा विक्रम मोडला. चहलने ३४ सामन्यांत ५० बळी घेतले होते.

सूर्या ४४ चेंडूत ८३ धावा करून बाद झाला. तो ज्या प्रकारे खेळत होता, ते पाहता त्याने सहज आपला चौथा टी-२० आंतरराष्ट्रीय बनवले असते, पण हवाई शॉट खेळताना तो सीमारेषेवर झेलबाद झाला. युवा फलंदाज तिलक वर्माचेही त्याच्या दुसऱ्या सामन्यात सलग दुसरे अर्धशतक हुकले. तो ९ धावांवर नाबाद परतला तेव्हा स्ट्राइक एंडला उभा असलेला कर्णधार हार्दिक पांड्याने षटकार ठोकून विजयावर शिक्कामोर्तब केले. आता या मालिकेतील चौथा सामना १२ तारखेला फ्लोरिडा (अमेरिका) येथे होणार आहे.

१० चौकार आणि चार षटकारांची स्फोटक खेळी खेळणाऱ्या सूर्यकुमार यादवला पहिल्याच षटकात क्रीझवर यावे लागले. कारण नवोदित यशस्वी जैस्वालने पहिल्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात दोन चेंडूंत केवळ एक धाव घेतली. सहा धावांवर या धक्क्यानंतर शुभमन गिल (६) ही स्वस्तात बाद झाला. येथून सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा यांनी ३४ धावांनी धावसंख्या १२१ पर्यंत नेली. दोघांमध्ये मॅच विनिंग पार्टनरशिप होती.

याआधी द्विपक्षीय टी- २० मालिकेत भारतीय संघ १३ वेळा करो या मरोच्या परिस्थितीत अडकली होता. म्हणजेच मालिका वाचवण्यासाठी तो सामना कोणत्याही किंमतीत जिंकायचा होता. मागील १३ सामन्यांपैकी संघाने ११ सामने जिंकले होते, तर एका सामन्याचा निकाल लागला नाही. २०१५ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळल्या गेलेल्या मालिकेतील करो या मरोच्या सामन्यातच भारताला पराभवाला सामोरे जावे लागले होते. आता येथेही विजय मिळाला आहे.

तत्पूर्वी, ब्रँडन किंग आणि मायर्स यांनी पॉवर प्लेमध्ये ३८ धावा केल्यामुळे वेस्ट इंडिजने सातव्या षटकात ५० धावा केल्या. ऑगस्ट २०२२ नंतर टी-२० सामन्यात वेस्ट इंडिजच्या सलामीच्या जोडीने ५० हून अधिक धावांची भागीदारी करण्याची ही पहिलीच वेळ होती. अक्षरने पुढच्याच षटकात मायर्सला बाद करत ५५ धावांची भागीदारी संपुष्टात आणली.

पाऊस, खराब प्रकाश, खराब मैदान ही कारणे अनेकवेळा सामना उशिरा सुरू होण्यास कारणीभूत आहेत, परंतु या सामन्याला उशीर होण्याचे कारण कदाचित सर्वात विचित्र होते. नाणेफेकीनंतर भारतीय संघ प्रथम क्षेत्ररक्षणासाठी वेळेत मैदानावर आला. त्यानंतर अचानक खेळाडू मैदान सोडू लागले. तोपर्यंत ३० यार्ड सर्कलची रेषा काढण्यात आली नसल्याची माहिती मिळाली. त्यानंतर वर्तुळ तयार करून सामना सुरू करण्यास ग्रीन सिग्नल देण्यात आला. आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना उशिरा सुरू होण्याच्या या कारणाने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला.

सुवर्णपदक विजेती द्रुती लाडचा सन्मान

। खांब । वार्ताहर । मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक मिळविल्याबद्दल उसर येथील द्रुती लाड हिचा कोकण शेतकरीव मजूर सामाजिक संस्थेच्या वतीने एका कार्यक्रमात सन्मान करण्यात आला आहे.

उसरची सुकन्या असणारी द्रुती जयराम लाड ही कोएसो मेहेंदळे हायस्कूलची विद्यार्थ्यांनी आहे. उसर येथे झालेल्या एका कार्यक्रमात संस्थेच्या वतीने अध्यक्षा प्रियंका कांबळे यांच्या हस्ते तिला सन्मानित करण्यात आले.यावेळी सचिव मच्छिंद्र पाटील,उपाध्यक्ष मंगेश कोकळे, रोहा तालुका अध्यक्ष सुशील खांडेकर,विभाग प्रमुख संदीप सावंत व पदाधिकारी तसेच सुधिर पाटील,संतोष यादव,संजय चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

भारत - पाकिस्तान एकाच गटात

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था । चीनमधील हांगझोऊ येथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेमध्ये भारतीय हॉकी संघ आणि पाकिस्तान हॉकी संघ एकाच गटात असणार आहे. भारत आणि पाकिस्तान संघाला ग्रुप अ मध्ये ठेवण्यात आले आहे. या ग्रुपमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्याव्यतिरिक्त जपान, बांगलादेश, सिंगापूर आणि उझबेकिस्तान या संघांचा देखील ग्रुप अ मध्ये समावेश आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हाय व्होल्टेज सामना हा ३० सप्टेंबरला होणार आहे. दुसरीकडे भारतीय महिला हॉकी संघही ग्रुप अ मध्ये समाविष्ट आहे. या ग्रुपमध्ये कोरिया, मलेशिया, चीन, ओमान, थायलंड आणि इंडोनेशिया या संघाचा समावेश आहे. हांगझोऊ एशियन गेम्स आयोजक समिती आणि एशियन हॉकी फेडरशेनने आज संयुक्तरित्या हॉकीचे वेळापत्रक घोषित केले. याबाबत बोलताना संघनायक हरमनप्रीत सिंगने सांगितले की, मआमच्या सोबत ग्रुप अ मध्ये काही तगडे संघ देखील आहेत. यात जपानच्या संघाचा देखील समावेश आहे. त्यांनी २०१८ च्या एशियन गेम्समध्ये सुवर्ण पदक पटकावले आहे. मात्र आम्ही प्रत्येक संघाला आव्हानात्मक संघच समजणार आहोत. कोणालाही हलक्यात घेणार नाही.फ

आशिया क्रीडा स्पर्धा ३० सप्टेंबरला होणार लढत

तो पुढे म्हणाला, मआशियाई स्पर्धेत आम्ही यातील बऱ्याच संघांसोबत खेळत आहोत. आम्ही हा अनुभव भविष्यात देखील वापरण्याचा आणि त्याचा फायदा उचलण्याचा प्रयत्न करू.फ

हॉकीचे सर्व सामने हे हांगझोऊ येथील गाँगशू कनाल स्पोर्ट्स पार्क स्टेडियममध्ये होणार आहेत. हॉकीची पुरूष संघाची फायनल ही ६ ऑक्टोबरला खेळवण्यात येणार आहे. तर महिला हॉकीची फायनल त्याच्या पुढच्याच दिवशी म्हणजे ७ ऑक्टोबरला होणार आहे.

राहुल द्रविडचे कर्णधाराला सहकार्य नसते

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था । भारतीय संघाचे प्रशिक्षक राहुल द्रविड कर्णधाराला सहकार्य करत नसल्याचा आरोप माजी यष्टीरक्षक पार्थिव पटेल याने केला आहे.

२०२१ च्या टी-२० विश्वचषकानंतर राहुल द्रविडने भारतीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून भारतीय संघाने दोन आयसीसी ट्रॉफी जिंकण्याची संधी गमावली. टी-२० विश्वचषक २०२२ च्या उपांत्य फेरीत इंग्लंडकडून पराभूत. त्यानंतर वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या दुसऱ्या आवृत्तीच्या अंतिम फेरीतही संघाला ऑस्ट्रेलियाकडून पराभवाचा सामना करावा लागला.

याशिवाय भारतीय संघाने घरच्या मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध एकदिवसीय मालिका गमावली. बांगलादेशला गेलो आणि तिथेही एकदिवसीय मालिका गमावली. आता वेस्ट इंडिजमध्ये काय स्थिती आहे हे सर्वांसमोर आहे. या सगळ्यानंतर काही चाहते द्रविडवर सोशल मीडियावर टीका करत आहेत. आता यामध्ये त्याच्यासोबत खेळलेल्या एका सहकारी क्रिकेटपटूनेही त्याच्या कोचिंगवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. माजी यष्टीरक्षक फलंदाज पार्थिव पटेलने मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडवर प्रश्न उपस्थित केले आहेत. आपल्या वरिष्ठ द्रविडसोबत दीर्घकाळ खेळणाऱ्या पार्थिवने हार्दिकच्या कर्णधारपदावर होणाऱ्या परिणामाचा उल्लेख करत द्रविडवर प्रश्न उपस्थित केले. क्रिकबझशी बोलताना पार्थिव पटेल याने द्रविडच्या भूमिकेबाबत साशंकता व्यक्त केली.

संजू सॅमसनला संघात स्थान मिळणे कठीण

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था । विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील भारतीय संघात संजू सॅमसनला स्थान मिळणे अशक्य वाटत असल्याचे मत ज्येष्ठ क्रिकेटपटू आर.अश्विन याने व्यक्त केलेले आहे.

अश्विन आपल्या यू ट्यूब चॅनलवर बोलताना म्हणाला की, मविंडीज मालिकेत संधी मिळालेला खेळाडू म्हणजे संजू सॅमसन. त्याने एक दिवसीय मालिकेत अर्धशतकी खेळी केली होती. टी २० मालिकेत त्याने १२ चेंडूत १२ धावा केल्या.

> संजू सॅमसनसाठी मत्याच्यासाठी चौथ्या क्रमांकावर कोणतीही जागा रिक्त नाहीये. त्याच्यासाठी टीम इंडियातील जागा ही वर्ल्डकपनंतर किंवा दोन तीन वर्षांनी रिकामी होईल. आपल्याकडे वाट पाहण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही.फ
> - आर.अश्विन,क्रिकेटर

त्याला मधल्या फळीत फलंदाजीची संधी मिळाली. आयपीएलमध्ये तो तिसऱ्या किंवा चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करतो. मसंजू सॅमसनचे वनडेमध्ये चांगले रेकॉर्ड आहे. त्याची सरासरी देखील चांगली असून त्याने तिसऱ्या वनडे सामन्यात अर्धशतकी खेळी देखील केली आहे. त्याने फिरकीवर हल्ला चढवला होता. त्याची ही खासियत आहे, असेही अश्विनने व्यक्त केल्या.यावेळी व्हीव्हीएस लक्ष्मण आणि सय्यद किरमाणी हे देखील या सोहळ्याला उपस्थित होते.

भारत आणि पाकिस्तानचे संघ पुढील दोन महिन्यात आशिया चषक आणि विश्वचषक स्पर्धेत एकमेकांविरुद्ध अनेक सामने खेळणार आहेत. २ सप्टेंबरला आशिया चषक २०२३ मध्ये दोन्ही संघ भिडणार आहेत. यानंतर ते १५ ऑक्टोबर रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर वर्ल्ड कप २०२३ मध्ये आमनेसामने असतील. मात्र, हा भारत-पाकिस्तान सामना १४ ऑक्टोबरला खेळवला जाऊ शकतो, असे मानले जात आहे.

अनिल कुंबळेंचा भारतीय संघाला इशारा

पाकिस्तानकडून हराल तर खबरदार

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था । आगामी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघ एकवेळ केनियाकडून हरला तरी हरकत नाही, पण संघाने पाकिस्तानकडून कदापि पराभूत होऊ नये,असा मौलिक सल्ला ज्येष्ठ क्रिकेटपटू अनिल कुंबळे यांनी भारतीय संघाला दिलेला आहे.

भारत येत्या दोन महिन्यांत आशिया चषक आणि विश्वचषक स्पर्धेत पाकिस्तान विरुद्ध अनेक सामने खेळणार आहे. तत्पूर्वी डावखुला गोलंदाज अनिल कुंबळेने एक महत्त्वाची गोष्ट सांगितली. तो म्हणाला, या सामन्याला इतर कोणत्याही क्रिकेट सामन्याप्रमाणे घ्यावे. एकदिवसीय विश्वचषकाच्या इतिहासात भारतीय क्रिकेट संघ पाकिस्तान संघाकडून एकदाही पराभूत झालेला नाही हे लक्षात ठेवावे असे तो म्हणाला.

> आमच्या काळात म्हणले जात होते एकवेळ केनियाकडून हारा पण पाकिस्तानकडून नाही. त्यामुळे खेळाडूंवर दडपण आणि अपेक्षा दोन्ही जास्त होत्या. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामने असेच खेळले जात आहेत आणि मुख्य म्हणजे तो फक्त इतर सामन्याप्रमाणे घेतला जावा.
> अनिल कुंबळे, माजी क्रिकेटर

पिचसाइडफ्लॉंचकार्यक्रमादरम्यान अनिल कुंबळे यांनी आपल्या भावना

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)